तुमच्या जिभेला द्या चव...आणि भोजनाचा घ्या आनंद...
स्वादिष्ट.. रुचकर राजस्थानी थाळी
लोकसेवा प्युअर व्हेज
एम.जी.रोड, अहिल्यानगर. फोन : 2327060 मो. 9850799850



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. २४.०२.२०२६ | अंक नं. २७१ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020



समता पतसंस्था
टेन्शन नाही, रिटर्न्स निवडा!
ठेवींवर मिळवा १०% पर्यंतचे व्याज
अहिल्यानगर : मार्केट यार्ड | प्रेमदान चौक | दिल्लीगेट
संपर्क : ७७२२ ०७० २२२
www.samatapat.com

स्वप्नवत ऑफर... स्वप्नवत सफर...
१०१ भाग्यवंत जोडप्यांना चक्क FREE हनिमून टूर
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

22 कॅरेट सोन्याचा
सर्वात कमी भाव, सर्वात कमी मजुरी.
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹888/-
चंदुकाका ज्वेलर्स
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
Conditions Apply*


# नगर - दौंड महामार्गावर भीषण अपघातात चौघांचा जागीच मृत्यू ; तर एक मुलगा गंभीर जखमी, मारुती इको कारचा झाला चक्काचूर



भीषण अपघातात मारुती इको कारचा झालेला चक्काचूर.

श्रीगोंदा - नगर - दौंड महामार्गावर श्रीगोंदा तालुक्यातील कोळगाव शिवारात मंगळवारी (दि.२४) पहाटे झालेल्या मालट्रक आणि मारुती इको कारच्या भीषण अपघातात एकाच कुटुंबातील तिघांसह चालक अशा चौघांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. तर एक १३ वर्षाचा मुलगा गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

कोळगाव शिवारातील माऊली मंदिराजवळ पहाटे ३ वाजण्याच्या सुमारास ट्रक आणि इको कार यांची समोरासमोर जोरदार धडक झाली. दौंडकडून नगरकडे येणारा मालट्रक आणि नगरकडून दौंडच्या दिशेने जाणारी मारुती इको गाडी यांच्यात हा अपघात घडला. धडकेची तीव्रता इतकी जबरदस्त होती की, इको गाडीचा अक्षरशः चक्काचूर झाला.

या अपघातात इको गाडीचा चालक नितीन अनिल कोकाटे (वय २२, रा. काष्टी, ता.श्रीगोंदा) याचा जागीच मृत्यू झाला. तसेच गाडीत प्रवास करणारे गजानन जनार्धन पायघन (वय ४७), दुर्गा गजानन पायघन (वय ३६) आणि वैभव गजानन पायघन (वय १९) या आई-वडील व मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाला. एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाल्याने हृदय पिळवटून टाकणारी परिस्थिती निर्माण झाली आहे.

या अपघातात करण गजानन पायघन (वय १३) हा मुलगा गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर उपचार सुरू आहेत. पायघन कुटुंब मूळचे अकोला जिल्ह्यातील पातूर तालुयातील मळतूर येथील रहिवासी असून, कामानिमित्त सध्या श्रीगोंदा तालुक्यातील चिंभळे येथे वास्तव्यास होते. काष्टी येथील चालक नितीन कोकाटे यांना घेऊन ते गावी गेले होते. गावाहून चिंभळेकडे परत येत असताना हा भीषण अपघात झाला.

पहाटेची वेळ, विरळ वाहतूक आणि संभाव्य वेग यामुळे हा अपघात अधिक भीषण ठरल्याची चर्चा परिसरात आहे. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरु केले. बेलवंडी पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी पोहोचून पंचनामा व पुढील कार्यवाही करून वाहतुक सुरळीत केली. या घटनेमुळे नगर-दौंड मार्गावरील वाढत्या अपघातांबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे या मार्गावर वेग नियंत्रण, फलक, प्रकाशव्यवस्था याबाबत प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मगणी केली जात आहे.

## माळीवाडा परिसरातील दुकानातून चोरी; शेकडो चपलांचे जोड लंपास

### भरवस्तीत धाडसी चोरी झाल्याने व्यापारी वर्गात भीतीचे व चिंतेचे वातावरण

नगर - शहरातील माळीवाडा भागातील कपिलेश्वर मंदिरासमोर असलेले 'देवराज फूटवेअर' हे दुकान अज्ञात चोरट्याने फोडले आहे. दुकानाचा मागील लाकडी दरवाजा तोडून चोरट्याने आत प्रवेश केला आणि तब्बल ९० हजार रुपये किमतीचे २८० चपलांचे जोड लंपास केले आहेत. २२ फेब्रुवारी रोजी दुपारी दीड ते २३ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजेच्या दरम्यान ही चोरी झाली.

याबाबत देवेश राजेश नारंग (वय २६, रा. रा पारिजात चौक, ममता गॅस गोडावून मागे, गुलमोहर रोड, अहिल्यानगर) यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. नारंग यांचे माळीवाडा परिसरात कपिलेश्वर मंदिरासमोर देवराज फूट वेअर हे चपलांचे दुकान आहे. अज्ञात चोरट्याने दुकानाचा मागील बाजूचा दरवाजा कशाच्या तरी साहाय्याने तोडून आत प्रवेश केला. दुकानातील ७० हजार रुपये किमतीचे 'लान्सर' कंपनीचे २०० जोड आणि २० हजार रुपये किमतीचे 'मंजित प्लास्टिक' कंपनीचे ८० जोड, असा एकूण ९० हजार रुपयांचा माल चोरीला गेला आहे.

घटनेची माहिती मिळताच कोतवाली पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड व पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख यांनी पाहणी केली असून ठसेतज्ज्ञ व श्वानपथकास पाचारण करण्यात आले. या प्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३३१ (३), ३३१ (४) व ३०५ (३) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून महिला पोलीस नाईक पंडित पुढील तपास करत आहेत. शहराच्या मध्यवस्तीत दुकान फोडल्याने व्यापाऱ्यांमध्ये चिंतेचे व भीतीचे वातावरण पसरले आहे.

## बसस्थानकातून दागिन्यांची चोरी

### पोलिसांनी तत्परता दाखवत ५ महिलांना पकडले, ३ लाखांचे दागिने हस्तगत

नगर - केडगाव बस स्थानकावर प्रवाशांच्या गर्दीचा फायदा घेऊन एका वृद्ध महिलेच्या बॅगेतून सुमारे अडीच तोळे सोन्याची मोहनमाळ चोरी केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी पाच संशयित महिला आरोपींना ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून चोरलेले ३ लाखांचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत.

ताराबाई महादेव शेलार (वय ६५, धंदा गृहिणी, रा. पळवे खुर्द, ता. पारनेर) या २३ फेब्रुवारी रोजी सकाळी ११.३० च्या सुमारास केडगाव येथून पुण्याकडे जाण्यासाठी निघाल्या होत्या. बस थांब्यावर एसटी बसमध्ये चढताना प्रवाशांची मोठी गर्दी झालेली होती. या गर्दीचा फायदा घेत आरोपींनी शेलार यांच्या बॅगेची चेन अत्यंत शिताफीने उघडली. बॅगेच्या आतील कप्प्यात ठेवलेली ७८ आणि ८१ मणी

(पुढील मजकूर पान २ वर)


पाहिजेत
सोनचाफा ज्वेलरी शोरुमकरिता सेल्सगर्ल्स पाहिजे (आकर्षक पगार)
भेटा : कोहिनूर समोर, कापडबाजार, अहिल्यानगर
9356352421

International Award Winner Multi-State Company
Akash ejoshi AkashPrecision Components Private Limited
Since 2006
Electric Motors I Pumps I Gear Box I E-Bikes I Electrical Starter
पाहिजेत
* इलेक्ट्रीकल इंजिनिअर- जागा २ (डिप्लोमा व अनुभव आवश्यक)
* क्वालिटी इंजिनिअर- जागा १ (डिप्लोमा व अनुभव आवश्यक)
* मेकॅनिकल इंजिनिअर- जागा २ (डिप्लोमा व अनुभव आवश्यक)
* अकौंटस् ऑफिसर - जागा १ (अकौंटस्चा २ ते ५ वर्षे अनुभव आवश्यक)
* परचेस ऑफिसर - जागा २ (अनुभव आवश्यक)
* सीएनसी ऑपरेटर - जागा १० (अनुभव आवश्यक)
* प्रेस ऑपरेटर - जागा १० (अनुभव आवश्यक)
* स्टोअर असिस्टंट - जागा २ (अनुभव आवश्यक)
* डिस्पॅच असिस्टंट - जागा २ (अनुभव आवश्यक)
* ड्रायव्हर - जागा ४ (निर्व्यसनी, ट्रान्सपोर्ट लायसन्स व अनुभव आवश्यक)
* सिक्युरिटी ऑफिसर - जागा १ (संगणकाचे ज्ञान, व अनुभव आवश्यक, माजी सैनिकांना प्राधान्य.)
* सिक्युरिटी गार्ड - जागा ४ (अनुभव आवश्यक)
* लेडिज असेंम्बलर - जागा १० (अनुभवींना प्राधान्य
* जेन्टस् असेंम्बलर - जागा १० (अनुभवींना प्राधान्य
वरील सर्व पदांसाठी संगणकाचे ज्ञान आवश्यक असून, पात्र स्त्री/पुरुष उमेदवारांनी मुलाखतीसाठी प्रत्येक बुधवारी खालील पत्त्यावर उपस्थित रहावे.
बी-३९, अग्निशमन केंद्राजवळ, एमआयडीसी, अहिल्यानगर
Email : cmd@akashprecision.com
Mobile No. 98220 84131

हॉटेल भारत भुवनची....
मायरा स्पेशल पाव भाजी व स्पेशल पुलाव
स्वाद घेण्यासाठी अवश्य एकदा भेट द्या....
पार्सल सुविधा उपलब्ध
पत्ता : हॉटेल भारत भुवन, माळीवाडा वेशीजवळ, अहिल्यानगर
टीप : वेळ सायंकाळी ५ ते रात्री १०:३० वाजेपर्यंत

मा. खासदार डॉ. सुजयदादा विखे पा.
यांची भारतीय जनता पार्टीच्या
प्रदेश उपाध्यक्षपदी
नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे
हार्दिक अभिनंदन...
* शुभेच्छुक *
श्री. वसंत राठोड
व्हाईस प्रेसिडेंट-कॅन्टोंमेन्ट बोर्ड, भिंगार
शहर कार्यकारिणी सदस्य
भारतीय जनता पार्टी, अहिल्यानगर

महाराष्ट्रातील सर्वात स्वस्त कापड मॉल
महावीर मॉल
* वेलवेट आसन मोठे 40 /- रु * जम्बो साईज कॉटन टॉवेल 99/- रु.
* 10 रुमाल 99/- रु.मधे * डबल बेड बेडशीट 299/- रु.मधे
* पायपुसणी मोठी साईझ 4 नग 99 /- रु. मधे
* सियाराम पॅन्टपीस- शर्टपीस जोडी 399/- रु. मधे
* रेमंड 1000 रु मीटर चे शुटिंग 400/- रु मीटर मधे.
* क्लासिक कंपनीची सन कॅप 60/- रु. मधे.
स्टॉक क्लिअरन्स सेल
अधिक माहितीसाठी भेट द्या..
श्री महावीर कलेक्शन
मार्केट पेक्षा वेगळ पाहिजे तर मार्केट पेक्षा वेगळ्या ठिकाणी यावे लागेल.
मारुती मंदिरा समोर, मर्चंट बँके जवळ, मार्केटयार्ड, अ.नगर. Mo. 98222 52001

आशिर्वाद
24 Feb.
वाढदिवस
गणेश शेठ
सदैव प्रकाशत राहील
तुमच्या कर्तृत्वाचा ठसा
नेहमीच बहरत राहो
तुमच्या नेतृत्वाचा वसा
उद्योजक
मा.श्री. गणेशशेठ औटी
आपणांस
वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!
• शुभेच्छुक •
श्री.दगडुमामा पवार (मा. नगरसेवक) | श्री.उदयभाऊ कराळे (मा. नगरसेवक)

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## नगरमध्ये भररस्त्यात लेबर कॉन्ट्रॅक्टरला मारहाण

नगर - शहरातील न्यू आर्ट्स कॉलेज परिसरात किरकोळ कारणावरून एका लेबर कॉन्ट्रॅक्टरला लाथाबुक्क्यांनी आणि टनक वस्तूने बेदम मारहाण केल्याची घटना घडली आहे. या राड्यामध्ये त्यांची सोन्याची चेन गहाळ झाली असून, तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी धमन्य रवींद्र फाकणे (वय २०, रा. साईराम नगर भिस्तबाग) हे २२ फेब्रुवारी रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास न्यू आर्ट्स कॉलेज च्या गेट जवळ चोभे हॉस्पिटलकडे जाणाऱ्या रस्त्यावरून जात होते. यावेळी आरोपी पंकज पराळे हा मोटारसायकलवरून, तर ऋषिकेश पराळे हा काळ्या रंगाच्या 'थार रॉक्स' (क्र. एम.एच. १६ डी.डब्ल्यू. १०००) कारमधून आपल्या सहकाऱ्यांसह तेथे आले. आरोपींनी फिर्यादीला गाठून अश्लील शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. यावेळी एका आरोपीने काकडे यांची गळ्यातील सोन्याची चेन आणि कॉलर धरून त्यांना खाली ओढले, ज्यामध्ये त्यांची चेन गहाळ झाली. त्यानंतर आरोपींनी त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करत कोणत्या तरी टनक वस्तूने डोक्यावर व कानामागे प्रहार करून जखमी केले. तुला बदला घ्यायचा असेल तर कायनेटिक चौकात ये, तिथे बघतोच, अशी धमकी देऊन आरोपी पसार झाले. याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी पंकज पराळे, ऋषिकेश पराळे व इतर दोघांविरुद्ध गुन्हा नोंदवला असून पोलीस नाईक अरुण गांगुर्डे पुढील तपास करत आहेत.

## महावितरणकडून ग्राहकांवर लादलेले निर्बंध बेकायदेशीर आणि सौर धोरणाच्या विरोधात

### तत्काळ मागे घेण्याची व्यावसायिकांची मागणी, ऑल-इंडिया रिन्यूएबल एनर्जी असोसिएशनचे जिल्हा प्रशासनास निवेदन


महावितरणकडून ग्राहकांवर लादलेले निर्बंध बेकायदेशीर आणि सौर धोरणाच्या विरोधात निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांना ऑल-इंडिया रिन्यूएबल एनर्जी असोसिएशनचे जिल्हा संचालक अमित काळे यांनी निवेदन देऊन त्वरित योग्य कारवाई करण्याची मागणी जिल्हा प्रशासनाकडे केली.

नगर - राज्यातील महावितरणने केलेल्या नव्या नियम ानुसार केंद्र सरकारने सुरु केलेल्या पी. एम. सूर्यघर योजनेतील ग्राहकांनी घरांवर आस्थापित करायच्या सौर ऊर्जा प्रणालीच्या अधिकारावर महावितरणने गदा आणली असून, अनेक ग्राहकांचे तसेच व्यावसायिकांचे आर्थिक नुकसान होत आहे. महावितरणच्या नवीन अनाकलनीय धोरणामुळे, सरासरी वीज युनिट प्रमाणेच घरावर सौर ऊर्जा प्रणाली आस्थापित करायच्या आहेत. हे पूर्णतः बेकायदेशीर आणि सौर धोरण्याच्या विरोधात आहेत. संपूर्ण राज्यात यामुळे संतापाची लाट पसरली आहे. महावितरणने लादलेल्या नियमांमध्ये लवकरात लवकर बदल न केल्यास राज्यव्यापी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा अहिल्यानगर ऑल-इंडिया रिन्यूएबल एनर्जी असोसिएशनने दिला आहे.

यासंदर्भात निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांना ऑल-इंडिया रिन्यूएबल एनर्जी असोसिएशनचे जिल्हा संचालक अमित काळे यांनी निवेदन देऊन त्वरित योग्य कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. जिल्हा प्रशासनाला दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, ग्राहक अधिक अनुदान मिळवण्यासाठी जास्त सौर क्षमता बसवत आहेत, असा आरोप महावितरणकरत आहे. हा तथ्यहीन व दिशाभूल करणारा आरोप आहे. पी.एम. सूर्यघर योजनेअंतर्गत दिले जाणारे अनुदान ३ केव्ही पर्यंतच मर्यादित आहे. अधिक क्षमतेची सौर प्रणाली बसविल्यास अनुदानाची रक्कम वाढत नाही. सोलर व्यावसायिक, ग्राहकांवर मोठ्या क्षमतेची प्रणाली बसविण्यासाठी दबाव टाकत आहेत, हा महावितरणचा दावाही सपशेल खोटा आहे. पी. एम. सूर्यघर पोर्टल ग्राहकांना स्वतःचा पसंतीचा पुरवठादार निवडण्याचा व सौर क्षमतेबाबत निर्णय घेण्याचा अधिकार देते. ग्राहक निवासी अनुदानाचा व्यावसायिक वापरासाठी गैरवापर करत आहेत, हा महावितरणचा आरोपही निराधार व पूर्णपणे दिशाभूल करणारा आहे. अशा प्रकरणांत विक्रेते किंवा ग्राहकांना दोष देण्याऐवजी मंजुरी देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई केली पाहिजे.

महावितरणचे वरिष्ठ अधिकारी पंतप्रधानांच्या सूर्यघर कार्यक्रमाला आणि मुख्यमंत्र्यांच्या विकास दृष्टीकोनाला कमकुवत करत असून नागरिकांना त्यांच्या अधिकारांपासून वंचित करत आहेत. हे अधिकारी आपले गैरवर्तन आणि अपराध लपविण्यासाठी मंत्री, राजकारणी, प्रसारमाध्यमे आणि नागरिकांची खोटी माहिती देऊन दिशाभूल करत करत आहेत. या दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध संपूर्ण चौकशीचे आदेश देण्याची आमची मागणी आहे. पी एम सूर्य घर पोर्टलवर सध्या लादलेले निर्बंध बेकायदेशीर असून ते तात्काळ हटविणे आवश्यक आहे. महावितरणने पूर्वीची प्रणाली पुन्हा सुरू करावी आणि ग्राहकांना कोणत्याही अनावश्यक त्रासा शिवाय सौर ऊर्जा प्रणाली बसविण्याच्या अधिकाराचा आदर करावा, अशी आमची मागणी आहे.

यावेळी सौर वितरकांच्या शिष्टमंडळात भावेश भराडिया, नारायण शिरसाठ, संजय शिंपी, निलेश चिपाडे, ओमकार काळे, विलास गायकवाड, श्रीनिवास पाटील, प्रदीप करांडे, राजेंद्र सोनी, विशाल वाणवणे, आशिष गोंधळे, शशिकांत दिवटे, मनोज उंदारे, सुशील करांडे, प्रवीण लोळगे, चैतन्य जैन, तुषार शिंदे व दिलीप गुंजाळ आदी उपस्थित होते.

## भाजपच्या प्रदेश उपाध्यक्षपदी डॉ.सुजय विखे यांची नियुक्ती

### नवीन प्रदेश कार्यकारिणी जाहीर



मुंबई - राज्यातील लोकसभा, विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा धुरळा शांत झाल्यानंतर आता भारतीय जनता पक्षाने संघटनात्म क पातळीवर मोठे फेरबदल केले आहेत. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी २४ फेब्रुवारी रोजी पक्षाच्या नवीन प्रदेश कार्यकारिणीची अधिकृत घोषणा केली. आगामी राजकीय समीकरणे आणि पक्ष विस्ताराचा विचार करून या नवीन निवडींमध्ये जुन्या जाणत्या नेत्यांना बढती देण्यात आली असून अनेक नवीन चेहऱ्यांनाही संधी देण्यात आली आहे.

भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी मुंबईत पत्रकार परिषद घेऊन या नवीन टीमची माहिती दिली. निवडणुका पार पडल्यानंतर ही भाकरी फिरवण्याचे संकेत पक्षाने आधीच दिले होते. पक्षाचा प्रत्येक कार्यकर्ता सक्षम असून, ज्यांना सध्याच्या यादीत स्थान मिळालेले नाही, त्यांना आगामी काळात संघटनेच्या इतर महत्त्वाच्या जबाबदाऱ्यांमध्ये सामावून घेतले जाईल, असे आश्वासन चव्हाण यांनी यावेळी दिले.

या नवीन कार्यकारिणीत भाजपने एकूण १२ उपाध्यक्ष नियुक्त केले आहेत, ज्यात माजी खासदार आणि अनुभवी आमदारांचा समावेश आहे. यामध्ये प्रामुख्याने अहिल्यानगरचे माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, अतुल काळसेकर, डॉ. भारती पवार, संजय कौडगे, संजय भेंडे, रामदास तडस, केशव उपाध्ये, प्रवीण पोटे, गोपीचंद पडळकर, चैतन्यबापू देशमुख, प्रिया शिंदे आणि अर्चना पाटील चाकूरकर यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे.

सरचिटणीस पदासाठी सहा नेत्यांची निवड करण्यात आली आहे. आमदार निरंजन डावखरे, संजय कुटे, माधवी नाईक, राजेश पांडे, सुनील राणे आणि योगेश सागर हे आता प्रदेश सरचिटणीस म्हणून कामाची धुरा सांभाळतील. तर, चिटणीस पदावर पक्षाने मंगेश चव्हाण, परिणय फुके, वर्षा डहाळे, संजय जगताप, अर्चना डेहणकर, रोहिणी नायडू, राम सातपुते, प्रवीण घुगे, रेखा कुलकर्णी आणि भैरवी घाक यांसारख्या तरुण आणि आक्रमक चेहऱ्यांना स्थान दिले आहे.

कोल्हापूरच्या कृष्णराज महाडिक यांची 'भारतीय जनता युवा मोर्चा'च्या प्रदेशाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. महिला आघाडीचे नेतृत्व पुन्हा एकदा आक्रमक नेत्या चित्रा वाघ यांच्याकडेच सोपवण्यात आले आहे. योगेश टिळेकर यांची ओबीसी मोर्चाच्या अध्यक्षपदी नियुक्ती केली आहे. तसेच, मुंबईचे आमदार मिहीर कोटेचा यांच्याकडे पक्षाच्या कोषाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. दरम्यान, पक्षाचा चेहरा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'मुख्य प्रवक्ता' पदावर आता नवनाथ बन यांची वर्णी लागली आहे.

## केडगावातील व्यावसायिकाला फोनवरून दमदाटी

नगर - केडगाव परिसरातील एका मंगल कार्यालय व्यावसायिकाला मोबाईलवरून शिवीगाळ करून दमदाटी केल्याची घटना समोर आली असून, याप्रकरणी २३ फेब्रुवारी रोजी कोतवाली पोलीस स्टेशन येथे अदखलपात्र गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तक्रारदार प्रफुल्ल नवनीत सुरपुरिया (रा. विनायक नगर, अहिल्यानगर) हे मंगल कार्यालय व्यवसायाशी संबंधित आहेत. २२ फेब्रुवारी रोजी रात्री त्यांना पोपट कराळे यांनी मोबाईलद्वारे संपर्क साधला. संभाषणादरम्यान तू कमी किमतीत मंगल कार्यालयाची सुपारी देतोस, त्यामुळे आमच्या व्यवसायाचे नुकसान होत आहे, असा आरोप करत सुरपुरिया यांना शिवीगाळ करण्यात आली तसेच दमदाटी करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. घटनेनंतर प्रफुल्ल सुरपुरिया यांनी त्वरित कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. त्यांच्या तक्रारीवरून संबंधित व्यक्तीविरोधात अदखलपात्र गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

## बसस्थानकातून सोन्याच्या दागिन्यांची चोरी; गुन्हा दाखल

(पान १ वरुन)

असलेली, सुमारे अडीच तोळे वजनाची आणि ३ लाख रुपये किमतीची सोन्याची मोहनमाळ आरोपींनी चोरली.

चोरीची घटना लक्षात येताच फिर्यादी ताराबाई यांनी आरडाओरडा केला. त्यामुळे प्रसंगावधान दाखवत बस चालक आणि वाहकाने बस केडगाव पोलिस चौकी येथे नेली. तेथून कोतवालीचे पो.नि. संभाजीराव गायकवाड यांच्याशी संपर्क साधून माहिती देण्यात आली. गायकवाड यांनी लगेच महिला पो.हे.कॉ. रोहिणी दरंदले व महिला पो. कॉ. पल्लवी रोहकले यांना पोलिस गाडी घेवून केडगावयेथे पाठविले. त्यांनी तत्परतेने केडगाव येथे जावून बस मधील प्रवाशांकडे चौकशी केली.

बस मध्ये प्रवास करणाऱ्या मंजुळा व्यंकटेश मौदा, गिता राजु मॉंदा, सरीना अशोक मौंदा, भारती शिवा मौंदा आणि लक्ष्मी रामु मॉंदा (सर्व रा. लासुर रोड, गंगापूर, जि. छत्रपती संभाजीनगर) या पाच महिलांवर संशय आल्याने त्यांना बस मधून उतरवून पोलिस ठाण्यात आणले. त्यांची कसून चौकशी केल्यावर त्यांनी गुन्ह्याची कबुली देत चोरलेली ३ लाख रुपये किंमतीची सोन्याची मोहनमाळ काढून दिली. या पाचही महिलांच्या टोळीवर चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास महिला पोलीस हवालदार रोहिणी दरंदले करत आहेत.

## सांगळे गल्लीतून दुचाकीची चोरी

नगर - शहरातील सांगळे गल्लीतील समर्थ शाळेजवळून हिरो कंपनीची एच एफ डिलक्स मोटारसायकल (क्र. एमएच १६ सी डब्ल्यू २४४५) अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना २२ फेबुवारी रोजी रात्री ९.२० ते १० वाजेच्या दरम्यान घडली.

या बाबत गौरव किसन मोढवे (वय २६, रा. दिपाली हॉटेल शेजारी कल्याण रोड, अहिल्यानगर) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

## शिवाजी गोड यांचे अल्प आजाराने निधन



नगर - केडगाव येथील शंकरबाबा मठा जवळील रहिवासी शिवाजी भिमराज गोड (वय ७०) यांचे २४ फेब्रुवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर केडगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, सुन, नातवंडे, १ भाऊ, भावजय असा परिवार आहे. विनायक गोड यांचे ते वडील होत.

## ॲड. नामदेव तुपे यांचे अल्प आजाराने निधन




नगर - आनंदधाम जवळील रहिवासी ॲड. नामदेव ज्ञानदेव तुपे (वय ७७) यांचे २३ फेब्रुवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २४ फेब्रुवारी रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, २ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. कृषी अधिकारी जनार्दन तुपे यांचे ते बंधू तर मयूर तुपे यांचे वडील होत.

## प्रमोद मकासरे यांचे अल्प आजाराने निधन



नगर - गुलमोहोर रोड परिसरातील रहिवासी प्रमोद सॅम्युएल मकासरे (वय ६२) यांचे १४ फेब्रुवारी रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांचा दफनविधी बुऱ्हाणनगर येथील कब्रस्तानमध्ये करण्यात आला.

त्यांच्या मागे पत्नी, १ भाऊ, भावजय, २ बहिणी, २ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.


हनुमान चालिसा पाठ
बुधवार दि. २५/०२/२०२६
रात्री ८.३० ते १०.३०
श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर
केशव नानकराम नवलानी (परिवार), कवरनगर, नवलानी ग्राऊंड, तारकपूर, बब्बु नवलानी ९२०३००९००९
मंगल भक्त सेवा मंडळ, मंगल दत्तक्षेत्र, एम.आय.डी.सी.
श्री आदर्श कॉलनी मित्र मंडळ, हॉटेल आयरीश समोर, अजय गॅस एजन्सी जवळ, आनंदऋषीजी हॉस्पिटल जवळ, अभय कांकरिया ९८६०३००३०५

## कामगार हक्कांसाठी देशव्यापी 'सरकार जगाओ' आंदोलन; २५ फेब्रुवारीला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे, निदर्शने

### कामगारांच्या तोंडाला पाने पुसली आता हक्क मागण्याची वेळ

नगर - केंद्र सरकारने २१ नोव्हेंबर २०२५ पासून नवीन कामगार कायदे अर्थात ४ लेबर कोड लागू करल असल्याची घोषणा केली, परंतु २०२६-२०२७ या आर्थिक वर्षासाठी सादर केलेल्या ८० लाख कोटींच्या अर्थसंकल्पात त्याच्या अंमलबजावणीसाठी कोणतीही आर्थिक तरतूद केलेली नाही. देशाच्या प्रगतीत घाम गाळणाऱ्या कामगारांकडे सरकारने पूर्णपणे दुर्लक्ष केलेले आहे.

कंत्राटी, आऊटसोर्स, लिपिक, स्कीम वर्कर, प्लॅटफॉर्म वर्कर, गीग वर्कर, आदी नावाने कामगारांचे शोषण होत आहे. किमान वेतन, सामाजिक सुरक्ष, बोनस इत्यादि कायदेशीर हक्क ही दिले जात नाही खाजगी व औद्योगिक क्षेत्रात भरीव योगदान देऊन सेवानिवृत्त झालेल्या कामगारांना EPF ९५ अंतर्गत फक्त रु. १००० निवृत्ती वेतन/पेन्शन देत आहे. १९८९ पासून केंद्र व राज्य सरकार मध्ये भरती बंद केल्याने हजारो पदे रिक्त आहेत. त्या ठिकाणी कंत्राटी कामगारांना नाममात्र वेतन देऊन राबवून घेतले जात आहे. काम गारांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठीचे व्यासपीठ म्हणजे इंडियन लेबर कॉन्फ्रेंस गेल्या १० वर्षांपासून बंद करण्यात आलेली आहे यासह देशातील संघटित व असंघटित क्षेत्रातील कामगार, कंत्राटी कामगार, निवृत्त कामगार, सुरक्षा रक्षक, लिपिक, स्कीम वर्कर्स, आशा व अंगणवाडी कामगार, घरेलू कामगार, रिक्शा व टॅक्सी चालक, फेरीवाले, माथाडी आदी सर्व क्षेत्रातील कामगारांच्या मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी आणि न्याय मागण्यांसाठी व न्याय मिळविण्यासाठी भारतीय मजदूर संघाच्या २१ व्या त्रैवार्षिक अधिवेशनात ओडीशा येथील जंगनाथ पुरी येथे आंदोलनाचा इशारा देण्यात आला असून, २५ फेब्रुवारी रोजी देशातील सर्व जिल्हाधिकारी, तसेच तालुक्यातील तहसीलदार कार्यालयासमोर धरणा, निदर्शने करून जिल्हाधिकारी यांना पंतप्रधान व केंद्रीय कामगार मंत्री यांना देण्यासाठी निवेदन देण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाला अहिल्यानगर जिल्हयातील सर्व कामगार बंधु भगिनीनी अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर २५ फेब्रुवारी रोजी दुपारी ३.३० वाजता उपस्थित राहावे व सरकार जगाओ आंदोलन यशस्वी करावे असे आवाहन करण्यात आलेले आहे. संघटित व असंघटित क्षेत्रातील कामगार बंधु, भगिनी या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत असे भारतीय मजदूर संघाचे अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष सुजीत उदरभरे व जिल्हा चिटणीस कृष्णा साठे, संघटन मंत्री संतोष सुरवसे व कोषाध्यक्ष माणिक सोनटक्के यांनी सांगितले. कामगार बंधु भगिनींनी सहभागी व्हावे असे आवाहन भा. म. संघ अहिल्यानगर जिल्हा यांनी केले आहे.


वंचित कुटुंबांचा मनपाच्या घरकुल योजनांमध्ये तातडीने समावेश करून त्यांना कायमस्वरूपी निवारा द्यावा, या मागणीचे निवेदन उपायुक्तांना देताना रिपब्लिकन सेनेचे शिष्टमंडळ.

## घरकुलापासून वंचित गोरगरिबांना न्याय द्या

नगर - शहरातील अनेक गोरगरिब कुटुंबे गेली कित्येक वर्षे घरकुल योजनांपासून वंचित आहेत. या कुटुंबांचा महानगरपालिकेच्या घरकुल योजनांमध्ये तातडीने समावेश करून त्यांना कायम स्वरूपी निवारा द्यावा, अशी मागणी रिपब्लिकन सेनेच्या वतीने करण्यात आली. यासंदर्भात संघटनेच्या शिष्टमंडळाने महानगरपालिकेच्या उपायुक्तांना निवेदन सादर केले.

निवेदन देताना रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे, महेश भोसले, संजय ताकवाले, बाळासाहेब वाघमारे, बीबीताई टकले, सुनिता शिंदे, नेहा जावळे, सविता कवडे, वैशाली निमसे, मंगल बरकाडे, रूपाली आयची, नीलोफर पठाण आदी पदाधिकारी व बेघर कुटुंबीय उपस्थित होते.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सध्याच्या परिस्थितीत गोरगरिबांना स्वतःची जागा घेणे तर दूरच, साधे घर घेणेही अत्यंत कठीण झाले आहे. वारुळाचा मारुती व काटून खंडोबा परिसरात महानगरपालिकेचे अनेक एकर भूखंड उपलब्ध असून, त्या ठिकाणी पूर्वीप्रमाणे घरकुल योजना पुन्हा राबवावी. २०१२ ते २०१४ या कालावधीत याच ठिकाणी शासनाच्या एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत घरकुल योजना राबवून अनेक गोरगरिबांना किरकोळ दरात घरे देण्यात आली होती. त्याच धर्तीवर नव्याने प्रकल्प हाती घेऊन हातावर पोट भरणाऱ्या कुटुंबांना निवाऱ्याचा हक्क द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच केडगाव, सरस्वती परिसरातील फेस-१ व फेस-२ अंतर्गत वारुळाचा मारुती व काटवन खंडोबा येथे राबविण्यात आलेल्या गृहनिर्माण योजनांचा दाखला देत, भविष्यात शासनाने अशी योजना मंजूर केल्यास वंचित कुटुंबांना प्राधान्य द्यावे, असेही निवेदनात नमूद आहे. सध्या गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम संपुष्टात आला असला तरी, तोच प्रकल्प पुन्हा सुरू करण्यासाठी महापालिकेने शासनदरबारी पाठपुरावा करावा, अशी मागणी करण्यात आली.

दरम्यान, मागणी मान्य न झाल्यास रिपब्लिकन सेनेच्या वतीने मुंबई येथील आझाद मैदानावर धरणे आंदोलन अथवा उपोषण करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. शहरातील बेघर व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी संघटना संघर्ष करणार असल्याचे पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

## आदिशक्ती - पौराणिक स्त्रीशक्तीचा सुंदर उत्सव

### आय एम एस सिडसी तर्फे फॅन्सी ड्रेस स्पर्धेचे आयोजन




नगर - अंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने आय एम एस सिडसीतर्फे उदयामिनी या महिला उदयोजकांच्या वस्तूंचे प्रदर्शन व विक्रीचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने आदिशक्ती - पौराणिक स्त्रीशक्तीचा उत्सव या भावपूर्ण संकल्पनेवर आधारित फॅन्सी ड्रेस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्त्रीच्या सामर्थ्य, धैर्य आणि प्रेरणादायी रूपांचा गौरव करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

२० वर्षांवरील सर्व महिलांसाठी ही स्पर्धा खुली असून सहभागी महिलांनी एखाद्या पौराणिक स्त्री पात्राचे वेशभूषेसह सादरीकरण करायचे आहे. प्रत्येक स्पर्धकाला २ ते ३ मिनिटांचा वेळ देण्यात येणार असून त्या पात्राची ओळख व त्यामागील प्रेरणा थोडक्यात मांडणे अपेक्षित आहे.

स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क रु. ५० ठेवण्यात आले आहे. नोंदणीची अंतिम तारीख २६ फेब्रुवारी आहे. स्पर्धकांनी पूर्ण तयारीनिशी घरूनच यावे, कारण स्पर्धास्थळी बदलण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था उपलब्ध नाही. सादरीकरण सुसंस्कृत व विषयाला अनुरूप असावे. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील. ही स्पर्धा २८ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजता आय एम एस कॅम्पस, स्टेशन रोड, अहमदनगर येथे पार पडणार आहे.

स्त्रीशक्तीचा उत्सव साजरा करण्यासाठी महिलांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. अधिक माहितीसाठी आणि नाव नोंदणीसाठी डॉ. ऋचा तांदुळवाडकर ९८५०३७०१४१ यांच्याशी संपर्क साधावा.

## 'जागेवर निवड संधी' उपक्रमाचे २५ फेब्रुवारी रोजी आयोजन

नगर - जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या वतीने नोकरीइच्छुक उमेदवारांसाठी 'जागेवर निवड संधी' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत इच्छुक उमेदवारांनी ऑनलाइन नोंदणी पूर्ण करून प्रत्यक्ष उपस्थित राहावे व रोजगाराच्या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहायक आयुक्त रविकुमार पंतम यांनी केले आहे. हा उपक्रम २५ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, प्रशासकीय इमारत, पहिला मजला, टीव्ही सेंटर, अहिल्यानगर येथे होणार आहे.

या उपक्रमात कार्मी सिस्टीम प्रा. लि., फास्ट टॅग सर्व्हिस प्रा. लि. व पिपाडा किया मोटार्स, अहिल्यानगर या तीन खासगी आस्थापना सहभागी होणार आहेत. उमेदवारांची निवड प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे केली जाणार आहे. आयटीआय, डिप्लोमा, पदवी व पदव्युत्तर शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांसाठी जागेवरच नोकरीच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातील.

नोकरी इच्छुक उमेदवारांनी अद्याप सेवायोजन नोंदणी केली नसल्यास, त्यांनी www.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर जाऊन नोंदणी करावी. त्यानंतर लॉगिन करून शैक्षणिक पात्रतेनुसार उपलब्ध रिक्त पदांसाठी अर्ज करावा. तसेच, उपक्रमाच्या दिवशी प्रत्यक्ष उपस्थित राहून मुलाखती द्याव्यात.

उमेदवारांनी www.ncs.gov.in या राष्ट्रीय करिअर सेवा संकेतस्थळावरही नोंदणी करून याचा लाभ घ्यावा. माहितीसाठी समन्वयक वसीम खान पठाण (मो. ९४०९५५५४६५) यांच्याशी संपर्क साधावा.

# गृहिणी

## आरोग्य

### कच्ची केळी खा हाडे मजबूत करा

पिकलेले केळी तर आपण खातोच आणि आपल्याला हे माहीत आहे की हे किती फायदेशीर आहे, पण कच्च्या केळीचे फायदे आपल्याला ठाऊक आहेत का? भरपूर पोटॅशियम असल्याने कच्ची केळी आपल्याला पुरेसे व्हिटॅमिन आणि अँटिऑक्सीडंट देतात. हे आपली रोगप्रतिकार शक्ती वाढवतात आणि आणि दिवसभर आपल्याला ॲक्टिव ठेवण्यास मदत करतात. कब्ज्याचा त्रास असल्यास कच्ची केळी तुमच्यासाठी फायदेशीर आहे. त्यात असलेले फायबर आणि स्टार्च आतड्यांमध्ये संक्रमण रोखण्यास मदत करतो ज्याने पोट साफ राहते. पचन प्रक्रिया बरोबर ठेवण्यासाठी देखील हे उपयुक्त आहे. याचे सेवन केल्याने पचन रसांचा स्राव चांगल्या प्रकारे होतो आणि पचन प्रक्रिया योग्य राहते. कच्च्या केळींमध्ये असलेले कॅल्शियम हाड मजबूत करण्यात मदत करतो आणि गुडघ्यासंबंधी समस्या टाळण्यास मदत करतो. मधुमेह टाळण्यासाठी, कच्ची केळी फायदेशीर आहे. हे बऱ्याच वेळेपर्यंत भुकेला देखील नियंत्रित ठेवतात, ज्यामुळे आपण ओवर ईटिंग सवय टाळू शकता.

## पाककला

### अल्फ्रेडो पास्ता

**साहित्य :** दोनशे ग्रॅम फेटुचीनी पास्ता, दोन चमचे बटर, दोन लसूण पाकळ्या, दोनशे ग्रॅम मशरूम, एक कप हेवी क्रीम, अर्धा कप किसलेले परमेसन चीज, अर्धा टीस्पून काळी मिरी पूड

**कृती :** सर्वात आधी पास्ता उकळवून घ्यावा. आता पास्ता शिजल्यानंतर त्यातील पाणी काढून घ्यावे. आता एका पॅनमध्ये बटर गरम करून त्यात लसूण आणि मशरूम घाला आणि परतून घ्यावे. आता क्रीम, परमेसन चीज, काळी मिरी पूड आणि मीठ घालून मंद आचेवर दोन मिनिटे शिजवा. आता त्यात उकडलेला पास्ता घाला आणि चांगले मिसळा. तुम्हाला हवे असल्यास, वरून थोडेसे चीज किसून घ्या. तर चला तयार आहे आपला क्रिमी मशरूम अल्फ्रेडो पास्ता रेसिपी, गरम नकीच सर्व्ह करा.

## वास्तू

### मेष राशीचे नशीब पालटणार

जेव्हा ऐश्वर्य देवता शुक्र कर्माच्या राशी, कुंभ राशीत प्रवेश करतो, तेव्हा हे संक्रमण भौतिक आणि आध्यात्मिक प्रगतीचे दरवाजे उघडते. शुक्रचे हे संक्रमण आर्थिक दृष्टिकोनातून मेष राशीसाठी अत्यंत शुभ राहील. तुमचे करिअर स्थिर होईल आणि जे लोक दीर्घकाळापासून पदोन्नतीची वाट पाहत आहेत त्यांना मार्ग सापडेल. नवीन व्यवसाय सौदे फायदेशीर ठरतील. प्रेमसंबंध अधिक दृढ होतील आणि तुमच्या जोडीदारासोबत परस्पर समजूतदारपणा वाढेल. तथापि, लक्झरी वस्तूंवर खर्च वाढू शकतो., म्हणून तुमच्या बजेटकडे लक्ष ठेवा. आरोग्याच्या बाबतीत तुम्हाला उत्साही वाटेल.

## सौंदर्य

हातांच्या सौंदर्यासाठी नखे खूप महत्त्वाची आहेत. यासाठी, फक्त नखे स्वच्छ ठेवणे पुरेसे नाही, तर नखे सुंदर रंगांनी सजवणे देखील खूप महत्त्वाचे आहे. जर तुम्ही या हंगामात चमकदार रंगांपेक्षा थोडे वेगळे काहीतरी शोधत असाल, तर तुम्ही काही नखांचे रंग नक्कीच पाहू शकता जे निऑन आणि अतिशय स्टायलिश आहेत. निऑन नेल पेंट विविध प्रकारे करता येते. तुम्ही पूर्ण निऑन शेड निवडू शकता किंवा तुमचे नखे निऑन रंगवू शकता.

## सल्ला

खोबरेल तेल आणि व्हिनेगर समप्रमाणात मिसळून फर्निचर पुसल्यास नैसर्गिक चमक येते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. २५ फेब्रुवारी २०२६

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, फाल्गुन शुक्लपक्ष, रोहिणी १३।३९, सूर्योदय ०६ वा. ४० मि. सूर्यास्त ०५ वा. ३१ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : मनोबल व आत्मविश्वास वाढविणारी एखादी घटना घडेल. आपल्या प्रिय व्यक्तींचा सहवास लाभेल.

**वृषभ** : व्यवसायातील आर्थिक महत्त्वाची कामे मार्गी लावू शकाल. हितशत्रूंपासून सावध रहावे. सहकाऱ्यांशी शक्यतो वाद होऊ देऊ नयेत.

**मिथुन** : मनोबल व आत्मविश्वास उत्तम राहील. जिद्द व चिकाटीने कार्यरत राहून कामे मार्गी लावू शकाल.

**कर्क** : तांत्रिक वस्तू व वाहने जपून वापरावीत हलगर्जीपणा केल्यास धोका संभवतो. वडिलधाऱ्यांचा आधार मिळाल्याने अडकलेली कार्य पूर्ण होईल.

**सिंह** : वैवाहिक सौख्य लाभेल. मानसिक प्रसन्नता लाभेल. बाहेरचे जेवण शक्यतो टाळावे. आरोप-प्रत्यारोपांपासून दूर रहा.

**कन्या** : आजचा दिवस फायदेशीर ठरेल. आरोग्याकडे लक्ष द्यावे. कौटुंबिक वातावरण चांगले राहिल. आजच्या दिवसाचा उपयोग नाती-संबंधात नवीन उर्जा भरण्यासाठी करा.

**तूळ** : व्यवसायात उधारी, उसनवारीची कामे यशस्वी होणार आहेत. जुने मित्र भेटतील. मागील देणी फिटतील.

**वृश्चिक** : तुमच्या राहत्या जागेचे किंवा प्रॉपर्टीच्या जागेचे प्रश्न सोडवू शकाल. भावनात्मक स्वभावाचे असल्यामुळे आपणास नुकसान होण्याची शक्यता.

**धनु** : हाती घेतलेल्या कामात यश मिळवाल. जिद्द व चिकाटी वाढेल. वेळ आनंदपूर्वक व्यतीत होईल. महत्वपूर्ण कार्ये योग्य वेळी होतील.


**मकर** : प्रॉपर्टीची कामे मार्गी लागतील. व्यवसायातील आर्थिक गुंतवणूक फायदेशीर. मागील राहिलेले सरकारी काम पूर्ण होण्याचे योग आहेत.

**कुंभ** : रखडलेली कामे मार्गी लावू शकाल. आर्थिक लाभाचे प्रमाण समाधानकारक राहील.

**मीन** : शैक्षणिक व बौद्धिक क्षेत्रातील व्यक्तींना दिवस चांगला जाईल. वरिष्ठांकडून कौतुकाचा वर्षाव होईल.

# शब्दगंध क्र. ७३७४


सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द : -** १) वाचून; शिवाय ३) गरज; नड; जरुरी ७) सायंकाळ; संध्याकाळ ८) सारखा; समान ९) बऱ्याच काळापासून मनात राहिलेले दुःख; शल्य १०) संदेह; संशय; शंका; वर्ष; साल ११) नोकर; चाकर; पाईक १२) दुर्लक्ष; क्षमा १५) माझा; माझी; माझे १९) आस्था; आपुलकी २०) आश्चर्य; अचंबा २१) मोठेपणा; महती; थोरवी २२) पसरलेला सुगंध २३) बसक्या नाकाचा

**उभे शब्द :-** १) वृद्धी; वाढ; प्रगती; डेव्हलपमेंट २) नातेवाईक; आप्त ३) जोर; वेग; क्षोभ; त्वरा ४) अंथरूण वगैरेची गुंडाळी ५) सत्त्वयुक्त; सकस ६) रागीट; तापट १३) एक शब्दालंकार १४) फुलातील गोड रस; मध १६) उलटी होईल अशी मानसिक व शारीरिक स्थिती १७) अनादर; संकोच; शंका; संदेह १८) निरर्थक येजा; वायफळ चक्कर किंवा फेरी

### शब्दगंध क्र. ७३७३ चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : चेहरा कितीही सुंदर असून द्या, विचार कुरुप असतील तर तो देखणा वाटत नाही.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### 'स्ट्रॉबेरी लेग्ज' म्हणजे काय?

चेहरा आणि हातांसोबतच पायांचे सौंदर्य देखील महत्त्वाचे आहे. बऱ्याचदा महिला त्यांच्या शरीराची काळजी घेतात पण पायांच्या सौंदर्याची काळजी घ्यायला विसरतात. कधीकधी, लसीकरणानंतर मोठे छिद्र दिसतात, जे त्रासदायक असू शकतात आणि महिला ते लपवण्याचा प्रयत्न करतात. त्यांना स्ट्रॉबेरी लेग्ज म्हणतात. तर, या समस्येपासून कसे मुक्त व्हावे ते जाणून घेऊया.

मध आणि तूप हे शतकानुशतके औषधी वनस्पती म्हणून वापरले जात आहेत. हे मिश्रण लावल्याने त्वचेचा कोरडेपणा थांबतो. जर तुमची त्वचा जास्त छिद्रयुक्त असेल तर अर्धा चमचा साखर आणि एक चमचा तूप मिसळा आणि तुमच्या त्वचेवर मालिश करा. यातून मिळणारे पोषण तुमच्या पायांवरील छिद्रे काढून टाकण्यास मदत करेल. नारळ तेल संपूर्ण शरीरासाठी उत्तम आहे. तुमच्या स्ट्रॉबेरी लेग्ससाठी, नारळ तेल लिंबू, लैव्हेंडर आणि टी ट्री ऑइलमध्ये मिसळा आणि ते लावा. आंघोळ केल्यानंतर, ते लावा आणि १० ते १५ मिनिटे मालिश करा. यामुळे तुमची त्वचा मऊ आणि मॉइश्चरायझ होईल. कॉफी किंवा ब्राऊन शुगर मध आणि ऑलिव्ह ऑइलमध्ये मिसळा आणि लावा. एका दिशेने हलक्या हाताने मालिश करा. आंघोळीपूर्वी आणि आठवड्यातून दोनदा हे करा. यामुळे तुमच्या पायांची मृत त्वचा निघून जाईल आणि त्यांना मॉइश्चरायझेशन राहील.

.एप्पल साइडर व्हिनेगरचा वापर अन्नात आणि त्वचेच्या काळजीसाठी केला जातो. याचा वापर केल्याने तुमच्या पायांचे सौंदर्य वाढू शकते.

त्यात अँटीबॅक्टेरियल, अँटीफंगल आणि अँटीव्हायरल गुणधर्म असतात. ते तुमच्या शरीरावरील ब्लॅकहेड्स आणि डाग दूर करण्यास मदत करते. ते तुमच्या पायांना सुती कापडाने लावा आणि १५ मिनिटांनी कोमट पाण्याने धुवा. ही समस्या एका महिन्यात हळूहळू नाहीशी होईल.

कोरफड तुमच्या त्वचेसाठी आणि केस गळतीसाठी खूप प्रभावी मानला जातो. त्यातील घटक तुमची त्वचा हायड्रेट करतात आणि ती मऊ करतात. तुम्ही त्याचे जेल तुमच्या त्वचेवर दर दुसऱ्या दिवशी लावू शकता. १० ते १५ मिनिटांनी ते थंड पाण्याने धुवा.

### दूध न पिणारी मांजर

दक्षिण भारतातील विजय नगर मध्ये राजा कृष्णदेव राय ह्यांचे राज्य होते. एकदा विजय नगर मध्ये उंदरांनी खूप उच्छाद मांडले होते. या मुळे संपूर्ण प्रजा वैतागली होती. कारण ते सगळ्यांचे नुकसान करायचे कोणाच्या शेतात नुकसान करायचे तर कोणाचे कपडे कुरतडून टाकायचे. सर्व प्रजा हैराण झाली होती ते सर्व एके दिवशी राजाकडे गेले आणि यावर काही उपाय सुचवायला सांगितले.

प्रजेचे प्रमुख राजाला म्हणाले की महाराज आम्हाला या उंदरांपासून सुटका मिळवून देण्याची काही युक्ती करा. प्रमुखाचे म्हणणे ऐकून राजाने आदेश दिले की प्रत्येक घरात एक मांजर पाळावी आणि त्यांची काळजी घ्यावी. त्यांनी प्रत्येक घरात एक-एक गाय देखील दिली. महाराजांनी तेनालीला देखील एक गाय आणि मांजर दिली. मांजर आल्यावर उंदीर पळून गेले परंतु गायीचे दूध पिऊन पिऊन मांजरी जाड जाड झाल्या की त्यांना हलता येणे शक्य नव्हते.


तेनालीची मांजर देखील दूध पिऊन पिऊन जाडजुड झाली होती. ती फार आळशी झाली. तिच्या आळशीपणाला वैतागून तेनालीने एक युक्ती काढली. त्याने मांजरीच्या वाटीमध्ये गरम दूध ठेवले गरम दुधाला तोंड लावल्यावर लगेच मांजरीचे तोंड भाजले आणि तिने दुधाला तोंड लावले नाही.

अशा प्रकारे त्याची मांजर दुबळी झाली आणि इथे तिथे बागडू लागली राजाने सर्व मांजरीचे निरीक्षण करण्यासाठी मांजरींना दरबारात आणायला सांगितले. सगळ्यांच्या मांजरी जाड जुड झाल्या होत्या फक्त तेनालीची मांजर दुबळी होती. राजाने त्यांना त्याचे कारण विचारले त्यावर त्यांनी सांगितले की माझी मांजर दूध पीत नाही.

सगळ्यांनी याच्यावर विश्वास ठेवला नाही तेव्हा तेनालीने प्रात्यक्षिक करून दाखवले. त्यांनाही दुधाची वाटी मांजरीचा समोर ठेवताच मांजर पळाली. हे बघून सर्वांना आश्चर्य झाला आणि तेनालीला याचे कारण विचारले. तेव्हा तेनालीने घडलेले आणि केलेली युक्ती सांगितली अशा प्रकारे मांजरीने दूध पिणे सोडले आणि स्वतःचे जेवण स्वतःच शोधायला जाऊ लागली. असं करत ती चपळ झाली. अशा प्रकारे मालकाने सेवकाशी वागावे त्याला आळशी होऊ देऊ नये. तेनालीच्या गोष्टीला ऐकून राजाने त्यांचे कौतुक केले आणि त्यांना स्वर्ण मुद्रा दिल्या.

तात्पर्य - नेहमी परिश्रम करावे.

## जीवन का अमृत (भाग १)



प्रभुत्व प्रकट करता है। उसमें आदि-अनंत की ज्योति जगमगाती है और वह दूसरों के दीयों को प्रज्वलित करने में समर्थ हैं । सत्गुरु हर मंडल में अपने शिष्यों से आमने-सामने होकर बातें करता है और उनको जरूरत के समय सही सलाह देता है। जब कभी भी कोई खुले दिमाग से, किसी ऐसे सच्चे सत्गुरु के नजदीक आता हैं, तो वह सांत्वना की लहरों को अपनी ओर आते हुए पाता है और अंतर में ऊपर उठता हुआ महसूस करता है। उसके व्यक्तिगत वातावरण का हम पर अद्भुत असर पड़ता है। उसके शब्द, जो कि रूहानियत से भरपूर होते हैं, सुनने वालों के दिलों की गहराईयों तक असर करते हैं और कभी व्यर्थ नहीं जाते हैं । वह अदृश्य (प्रभु) 'एक बहुत चुनिंदा मानव चोले' का प्रयोग करता है, अर्थात् एक ऐसा इंसान, जो आत्म बलिदान एवं प्रभु के प्रति असीम प्रेम में बेजोड़ हो और अपने लगातार, अनथक और अनंत प्रयत्नों के परिणाम स्वरूप, प्रभु से अंतर में मिला हो, उसके कार्य में चेतन सहयोगी बना हो और जिसे प्रभु के प्यासे लोगों को सांत्वना देने का मिशन सौंपा गया हो, ताकि उनको सांसारिक झंझटों से मुक्त करा दे और उन सभी को प्रभु से जोड़ दें, प्रभु का ही रूप बना दें।

### प्रभु के प्रती असीम प्रेम

मैंने आपके लिए एक दोस्त ढूंढा है-एक ऐसा दोस्त, जो अभी भी सब से इस इंतजार में है कि आप उसकी ओर मुड़ें। वह सदा आपके साथ है, आपको प्रेम करता हुआ, आपके जीवन में भागीदार बनने की इच्छा करता हुआ तथा आपके प्रेम, आपके विचारों और आपके विश्वास को चाहता हुआ। आपने अपने और उस दोस्त के बीच विभिन्न विचारों का एक मोटा पर्दा खींच रखा है। इस पर्दे को हटाने की कोशिश करो और आप देखेंगे कि दोस्त बाहें फैलाए इंतजार कर रहा है, आपको प्रेम से गले लगाने का और सदा आपके साथ रहने का, इस जिंदगी में भी और इसके बाद भी। निराश न हों, आप बहुत प्यारे हैं। यदि सिर्फ आप अपनी नकारात्मक प्रवृति को छोड़ दें और ग्रहणशील बन जाएँ, तो हर वस्तु आपकी होगी। वह सदा आपके साथ है, हर संभव सहायता देता हुआ । यदि हम उसकी ओर मुड़े, तो वह लगातार हमारे साथ होगा, प्रत्यक्ष, दोनों रूपों में। वह आपसे बातें करेगा, जैसे कि बहुत से और लोगों से, उत्तरी अमरीका और अन्य देशों में उसने की हैं।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

सहस्त्रार चक्र -

२४ पूर्वज

डी. एन.ए. के द्वारा हम अपने पूर्वजो से जुड़े हुए हैं । पूर्वज अर्थात माता-पिता, दादा-दादी, नाना नानी, पति- पत्नी, बेटा-बेटी अर्थात जिन के शरीर से हमारे जन्म का सम्बन्ध है। पूरे कल्प हम ने जितने जन्म लिए हैं उन सब सम्बंधियो के जीन्स हमारे डी, एन. ए, में मैजूद हैं। हम जो कुछ भी सोचते हैं, विचार करते हैं, ये सब विचार सहस्त्रार चक्र में स्थित किसी एक एरियल (पंखुड़ी) द्वारा इन सब पूर्वजो को पहुंचते रहते हैं। हमारे ये सम्बन्धी जो कुछ भी सोचते हैं महसूस करते हैं, उन के ये संकल्प, हमारे सहस्त्रार में स्थित किसी दूसरे एरियल द्वारा रिसीव (प्राप्त) होते रहते हैं। आज विश्व क्यों नहीं बदल रहा, उस का कारण हम हैं, हम सभी बोलते अच्छा हैं परन्तु मन में धारणा नहीं है। अगर आप का योग अच्छा है विचार अच्छे हैं तो ये संकल्प हमारे पूर्वजों को मिलेंगे और वह भी अनजाने में बदलने लगेगें, चाहे उन्होंने संसार के किसी भी कोने में जन्म ले रखा है। उन सब व्यक्तियों के जो पूर्वज हैं उनको भी यही संदेश उन से आगे जाता रहता है। ये खुद बखुद हो रहा है चाहे हम जानते हैं या नहीं जानते हैं। इसलिए अगर हम विश्व को बदलना चाहते हैं मुझे अपने संकल्पों पर ध्यान रखना है सब के प्रति कल्याण का सोचना है। हमारा जितना प्यार भगवान से होगा, हमारे पूर्वजों का भी योग लगने लगेगा। यह विश्व देखते ही देखते बदल जायेगा। तभी कहते हैं एक योगी पुरे विश्व को बदल देता है।

### संकल्पो पर ध्यान रखना

सहस्त्रार चक्र -

२५ निर्भर व्यक्ति

हम जो कुछ सोचते हैं उस का असर सहस्त्रार चक्र में स्थित किसी एक एरियल द्वारा हर पल उन लोगों पर होता रहता है जो हमारे पर निर्भर हैं। निर्भर अर्थात हमारे परिवार के लोग, आफिस के कर्मचारी जो हमारे अधीन कार्य करते हैं और अध्यात्मिक लोग जिन के हम निमित हैं, मुखियां हैं।

ये लोग मुख के बोल से इतने नहीं बदलते जितने हमारे संकल्पों से बदलते हैं। मन में जो इन के प्रति भाव रखते हैं ये लोग वैसे ही बनते हैं। अगर आप के घर में औरतें, बच्चे दफ्तर के अधीनस्थ कर्मचारी और संस्था में नजदीकी अधीनस्थ जिज्ञासु बीमार रहते हैं तो इस का कारण आप के नकारात्मक विचार हैं। आप भाषण तो अच्छा करते हैं परन्तु मन में शुद्धता नहीं है। इस लिए मन में विचार शुद्ध करें, विश्व की चिंता न करें, अपने विचारो को बदलने की चिंता करें।

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

नवरा-बायकोचे जोरदार भांडण सुरू असते...

नवरा : तू गप्प बस जरा!

बायको : मला आता तुमच्यापासून वेगळे राहायचे आहे...

नवरा : खबरदार हा भांडण चालू असताना आनंदाची बातमी नाही सांगायची...

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* पदार्पणाच्या एकदिवसीय सामन्यात सर्वाधिक धावांची खेळी करण्याचा विक्रम कोणत्या देशाच्या क्रिकेट खेळाडूने केला आहे? - मॅथ्यू ब्रिटराके (द.आफ्रिका)

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आहारवेद - आरोग्य संवर्धन

रक्त विकारांमध्ये उदा. नाकाचा घोळणा फुटला असेल, शौचामधून रक्त पडत असेल, मुळव्याधीतून रक्त जात असेल, तसेच स्त्रियांमध्ये मासिक पाळीत अति रक्तस्राव होत असेल, तर या सर्व विकारांमध्ये आवळा चूर्ण किंवा आवळा रस घ्यावा.

आवळा, हिरडा, बेहडा ही द्रव्ये सम प्रमाणात घेऊन त्याचे चूर्ण बनवावे. यालाच त्रिफळा चूर्ण असे म्हणतात. हे चूर्ण रोज पाण्यात भिजत घालून सकाळी ते पाणी वस्त्रगाळ करून गाळलेल्या पाण्याने डोळे धुवावेत. असे केल्याने डोळ्यांचे तेज वाढते. तसेच रात्री झोपताना गरम पाण्यातून एक चमचा त्रिफळा चूर्ण घेतले, तर दुसऱ्या दिवशी सकाळी शौचास साफ होते.

जर डोकेदुखीचा त्रास होत असेल, तर आवळ्याचे चूर्ण, तूप व खडीसाखर सम प्रमाणात घेऊन एकत्र करावे व सकाळच्या वेळी अनुशापोटी हे मिश्रण सेवन केल्याने डोकेदुखीचा त्रास नाहीसा होतो.

### आवळा

५) केसांच्या तक्रारीवर उदा. केस गळणे, पांढरे होणे, कोंडा होणे, केस निस्तेज होणे या सर्वांवर आवळा, शंखपुष्पी, ब्राह्मी, जास्वंद यांनी युक्त तेल केसांना लावावे. काही दिवसांमध्येच केसांची वाढ चांगली होते. केस गळणे थांबते. केसांचा रंग टिकून राहतो व रात्री शांत झोप लागते.

६) तोंड बेचव होऊन मळमळ किंवा उलटी होत असल्यास आवळ्याचा रस व मध यांचे चाटण करावे. तोंडास रुची प्राप्त होते.

७) गर्भारपणात स्त्रीला उलटी व मळमळ वारंवार होत असते. अशावेळी आवळा सुपारी, कँडी व सरबत यांचा वापर करावा. यामुळे तोंडास रुची निर्माण होऊन मळमळ कमी होते.

८) नियमित आवळा सेवनाने स्मरणशक्ती व बुद्धी वाढते, म्हणून आवळ्यापासून तयार केलेला च्यवनप्राश आहारात नियमितपणे घ्यावा)

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर
मोबाईल नं- ८७९३४००४००

# निस्वार्थ व समर्पण भावनेने क्रीडा क्षेत्रात नवीन पिढी घडविण्याचे प्रा. संजय धोपावकर यांचे भरीव योगदान : आ. संग्राम जगताप


सावेडी येथील माऊली सभागृह येथे प्रा.संजय धोपावकर यांचा सेवापूर्ती समारंभानिमित्त नागरी सत्कार करुन क्रीडाधार स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

नगर – क्रीडा क्षेत्रासाठी काम करीत असताना पदके व नोकरी मिळाली तर एवढ्यावर न थांबता निस्वार्थ व समर्पण भावनेने क्रीडा क्षेत्रात नवीन पिढी घडविण्यासाठी मोठ्या जिद्दीने काम करणारे प्रा.संजय धोपावकर यांच्या सारखी माणसे पुढच्या पिढीत मिळतील का? प्रा.संजय धोपावकर यांचा आदर्श घेऊन नवीन पिढी घडावी. क्रीडा क्षेत्रातील गुरूंचा सन्मान करणारा हा कार्यक्रम शहराला दिशा देणारा आहे. प्रा.संजय धोपावकर यांनी क्रीडा क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याचा उल्लेख क्रीडाधार या स्मरणिकेत केलेला आहे. क्रीडा क्षेत्रातील धारेप्रमाणेच प्रा. धोपावकर यांचे कर्तुत्व शब्दात व्यक्त न करता येणारे असेच आहे. निस्वार्थ व समर्पण भावनेने क्रीडा क्षेत्रात नवीन पिढी घडविण्याचे प्रा.संजय धोपावकर यांचे भरीव योगदान आहे, असे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले आहे.

सावेडी येथील माऊली सभागृह येथे प्रा.संजय धोपावकर यांचा सेवापूर्ती समारंभानिमित्त नागरी सत्कार करण्यात आला. तसेच श्री.धोपावकर यांनी क्रीडा क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीचा उल्लेख असलेली क्रीडाधार या स्मरणीकेचे प्रकाशन करताना आमदार संग्राम जगताप, आनंद लिमये (माजी अप्पर मुख्य सचिव गृहविभाग, सदस्य महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई), सौ.धनश्रीताई विखे पाटील, सौ. पद्मजा धोपावकर, महापौर सौ.ज्योतीताई गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, हिंद सेवा मंडळाचे संचालक सुमतीलाल कोठारी, उद्योगपती राजेंद्र चोपडा, धनंजय, विजय, अजय, अमोल, आदित्य धोपावकर, प्रा.संजय साठे आदींसह क्रीडारसिक परिवार उपस्थित होते.

आनंद लिमये म्हणाले, प्रा.संजय धोपावकर यांच्या सेवानिवृत्ती व सत्कार समारंभ प्रसंगी उपस्थित राहण्याचा मला मान मिळाला याचा मला आनंद होत आहे. श्री.धोपावकर यांनी क्रीडा क्षेत्राकडे व्यवसाय म्हणून कधीच बघितले नाही तर व्रतस्थ राहून क्रिडा क्षेत्रात अमूल्य असे योगदान दिले आहे. खऱ्या अर्थाने शासन दरबारी त्यांचा बहुमान होऊ शकला नाही. परंतु त्यापेक्षाही मोठा सत्कार आज शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त खेळाडू व क्रीडा प्रेमींनी केलेला सत्कार आहे. कृतज्ञतेची खरी पावती म्हणून शासन दरबारी श्री.धोपावकर यांचा सन्मान व्हावा. यासाठी अहिल्यानगर येथील सर्व क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांनी प्रयत्न करावेत.

धनश्रीताई विखे म्हणाले, नगरच्या खेळाडूंना मोठे मोठे पुरस्कार मिळवून देण्याचे काम प्रा.धोपावकर यांनी केले आहे. सध्या खेळाला पालकांकडून विशेष लक्ष दिले जात असल्याने अभ्यासा बरोबरच खेळ तेवढाच महत्त्वाचा आहे. यापुढील काळातही नगरच्या खेळाडूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळण्यासाठी मार्गदर्शन करावे.

आनंद भंडारी म्हणाले, प्रा. संजय धोपावकर यांनी क्रीडा क्षेत्रात हजारो खेळाडूंना घडवून मोलाचे योगदान दिले आहे. शहराच्या क्रीडा क्षेत्रातील विकासासाठी योगदान द्यावे. यासाठी शासन स्तरावर सर्वतोपरी सहकार्य करू.

धनंजय जाधव म्हणाले, श्री शिव छत्रपती पुरस्कार प्राप्त खेळाडू घडविणारे प्राध्यापक संजय धोपावकर यांना अर्जुन पुरस्कार मिळावा यासाठी सर्वजण मिळून प्रयत्न करू. सेवानिवृत्तीनंतर प्रा. संजय धोपावकर यांनी महानगरपालिकेच्या क्रीडा विभागाची धुरा सांभाळावी.

सचिन जगताप म्हणाले, श्री. धोपावकर यांचे सारखे गुरु लाभले असताना १३ शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त खेळाडू अहिल्यानगर शहरात घडले आहेत. ज्याप्रमाणे पुण्याला विद्येचे माहेरघर म्हणतात त्याप्रमाणे क्रीडा क्षेत्रातील मान्यवरांनी एकत्र येऊन अहिल्यानगरला खेळाचे माहेरघर करण्यासाठी एकत्रित येऊन पाऊल उचलावे.

यावेळी राजेंद्र चोपडा, सुमतीलाल कोठारी यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी अनेक श्री शिवछत्रपती पुरस्कार विजेते, नवोदित खेळाडू, शहरातील क्रीडा रसिक, विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रिडाधार संपादक असिम शेख यांनी केले. सूत्रसंचालन प्रसाद बेडेकर यांनी केले. ऐश्वर्या कुलकर्णी यांनी आभार मानले.

प्रा.संजय धोपावकर म्हणाले, या कार्यक्रमात आयुष्यभर पुरेल एवढे कौतुक केलेले आहे. अहिल्यानगरच्या क्रीडाप्रेमींनी क्रीडाधार या स्मरणिकेची अमूल्य भेट दिली आहे. क्रीडाधार ही खेळाडूंची संपत्ती आहे. त्यामुळे मला श्रीमंत झाल्यासारखे वाटत आहे. क्रीडा क्षेत्रात काम करीत असताना माजी उपनगराध्यक्ष स्व.कृष्णाभाऊ जाधव व माजी आमदार स्व.अरुणकाका जगताप यांनी खेळाडूंना वेळोवेळी प्रोत्साहन दिले आहे. तसेच हिंद सेवा मंडळाने व सारडा महाविद्यालयाने क्रीडा संचालक म्हणून काम करीत असताना वेळोवेळी आमच्या मागण्या मान्य करून खेळाडूंना स्कॉलरशिप, ट्रॅक सूट, रोख बक्षिसे देऊन गौरविण्यात आले. क्रीडा क्षेत्रात काम करीत असताना आत्तापर्यंत तेरा श्री शिवछत्रपती पुरस्कार विजेते खेळाडूंना मार्गदर्शन केले आहे. यापैकी सहा खेळाडू ज्यूदो या खेळातील आहेत. क्रीडा क्षेत्रात चांगले काम करू शकलो यासाठी मला माझ्या परिवाराचा, सहकाऱ्यांच्या व पालकांचा पाठिंबा मिळाला आहे.

# प्रेरणादायी अक्षरधन

## गाडगेबाबांचे कीर्तन

"मुसाफिर" वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षरधन
संकलन: दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी चैतन्य पालवी
डॉ.रामचंद्र देखणे
'चपराक' प्रकाशित ललित चिंतन

गाडगेबाबांचे कीर्तन हा कीर्तन परंपरेचा एक नवा आविष्कार होता आणि कीर्तन प्रबोधनाचा एक नवा अवतार होता. भगवंताचे निरूपण करीत या कीर्तनाने प्रत्येकाच्या अंतःकरणातील भगवतृभाव जागा केला आहे. कीर्तन हे एकीकडे विश्वातील देव पहायला शिकवते तर दुसरीकडे माणसातील देवपण. वऱ्हाडालाही कीर्तन, निरूपण नवीन नव्हते. अनेक कीर्तनकार, कथेकरी, हरिदासी यांची कीर्तने वऱ्हाडाने ऐकली होती पण ऋणमोचनांतल्या गाडगेबाबांच्या कीर्तनाची वार्ता वऱ्हाडात गावोगावी जाऊन पोचली आणि वऱ्हाडकरांनी एक अलौकिक कीर्तन ऐकले.

वऱ्हाडी बोलीभाषेत लोकांशी संवाद साधीत साधीत ते लोकांच्या अंतरंगापर्यंत पोचत होते. दिवसभर भ्रमंती करावी, एखाद्या गावी जावे, प्रथम हातात खराटा घेऊन गाव स्वच्छ करावा. कुणी विचारायचे हा माणूस का गाव झाडतोय ? 'रात्री कुणा बुवांचे इथे कीर्तन होणार हाये...' भजनकरी, टाळकरी, श्रोते कीर्तनाला जमायचे आणि एक विलक्षण व्यक्तित्व दोन हात वर करून 'गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला...' असे भजन म्हणत कीर्तनात उभे राही. एका हातात गाडगे, एका हातात काठी, अंगावर चिंध्या लावलेला सदरा, पट्ट्यापट्ट्यांची विजार आणि त्यावर भगवी लुंगी बांधलेली, अर्धवट दाढी वाढलेली अशा वेशात हा कीर्तनकार पुढे उभा राहिला की मघाशी गाव झाडणारा हा वेडा माणूस काय कीर्तन सांगणार म्हणून लोक टिंगलटवाळी करायचे आणि गोपाला गोपाला भजन म्हणत बाबा श्रोत्यांशी प्रत्यक्ष संवाद करू लागत.

'बापहो गावात देव किती ?' लोक म्हणायचे 'एक'.

'पाहना बरं... नाही तर मंग भुलाल... गावात खंडोबाचं देऊळ आहे का नाही? आता देव किती झाले... ?'

'दोन' असे करत करत देवांची संख्या वाढत जायची.

'मग मारको, म्हेसको जागाई, जोखाई, क्षेत्रपाल, मारीमाय, मातामाय.... एवढ्या देवांचे करायचे काय ?

'असा कसा हा तुमचा देव। घेतो बकऱ्याचा जीव...? गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला...'

बाबा श्रोत्यांनाच प्रश्न विचारायचे. श्रोत्यांकडून उत्तरे काढून घ्यायचे. त्यांनाच भजन म्हणायला लावायचे. मग श्रोत्यांच्या जीवनातील अंधश्रद्धा, बुवाबाजी, विषमता, सावकारी पाश, पशुहत्या यावर प्रहार करीत कीर्तनातूनच प्रबोधनाचे प्रभावी संवादपीठ उभे राहायचे. आचार्य अत्रे म्हणतात, 'बाबांचे कीर्तन श्रवण हा एक महान अनुभव आहे. बाबांचे कीर्तन गरिबांसाठी, दलितांसाठी, दुःखितांसाठी आहे. त्यात योग नाही, अध्यात्म नाही, पोथी नाही, पुराण नाही. देवांची वर्णने नाहीत. धार्मिक रूढीखाली आणि आर्थिक सत्तेखाली भरडून निघालेल्या समाजाच्या उद्धाराचा झगझगीत प्रकाशझोत म्हणजे हे कीर्तन. प्रेमाधिष्ठित समता प्रस्थापित व्हावी असे ज्यांना वाटते त्यांनी आपले विचारांचे घट गाडगेबाबांच्या कीर्तनातून भरून घ्यावे लागतील. सिंहाला पहावे वनात, हत्तीला पहावे रानात, तसे गाडगेबाबांना पहावे कीर्तनात'... हेच खरे.

– किशोर गांधी

# संत निरंकारी मिशनच्या वतीने कापूरवाडी तलावसह देशभरात १६०० ठिकाणी राबविले स्वछता अभियान


संत निरंकारी मिशनच्या वतीने आयोजित देशव्यापी 'प्रोजेक्ट अमृत' परियोजनेच्या चौथ्या टप्प्याचे शुभारंभ प्रसंगी मार्गदर्शन करतांना सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज व निरंकारी राजपिता रमितजी. दुसऱ्या छायाचित्रात अहिल्यानगर मधील कापुरवाडी तलाव परिसरात येथील निरंकारी स्वयंसेवक स्वच्छता मोहिम राबवितांना. (छाया – किशोर खुबचंदानी)

नगर – संत निरंकारी मिशनच्या सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या पुढाकाराने बाबा हरदेवसिंगहजी महाराज यांच्या शिकवणीतून प्रेरणा घेत 'प्रोजेक्ट अमृत' हा उपक्रम नुकताच देशभर राबविण्यात आला मुख्य कार्यक्रम दिल्लीतील बुराडी रोड वरील भव्य मैदानावर आयोजित विशेष सत्संग कार्यक्रमात सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज व निरंकारी राजपिता रमितजी यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी सद्गुरु माताजींनी अमृतमय प्रवचनातून सांगितले की, बाबा हरदेवसिंहजी महाराज यांचे संपूर्ण आयुष्य मानवकल्याणासाठी समर्पित होते. त्यांच्या शिकवणुकी या केवळ स्मरण करण्याच्या नसून त्या जीवनात अंगीकारण्यासाठी आहेत, त्या अनुयायींच्या आचरणात दिसली पाहिजे असे शेवटी सांगितले.

'स्वच्छ जल, स्वच्छ मन' या महाअभियानाच्या चौथ्या टप्प्याचे भव्य आयोजन देशातील २५ राज्ये व केंद्रशासित प्रदेशातील ९३० शहरांमधील १६०० हून अधिक ठिकाणी यशस्वीरित्या पार पडले. यात सुमारे १२ लाख स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला. पाणी हे केवळ एक साधन नसून जीवनाचा आधार आणि ईश्वराची अमूल्य देणगी आहे. त्याचे संरक्षण करणे हे प्रत्येक नागरिकाचे नैतिक कर्तव्य आहे. ही जनजागृती समाजामध्ये निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

निरंकारी मिशनचे अहिल्यानगर क्षेत्र ३६ अ विभाग प्रमुख हरिष खुबचंदानी यांनी सांगितले की निरंकारी मिशनच्या नगर शाखेच्यावतीने सुद्धा रविवारी बुऱ्हाणनगर जवळील कापूरवाडी तलाव व परिसरात सकाळी ८ ते ११ या वेळेत जलस्वच्छता अभियान राबविण्यात आले व परिसरातून मोठ्या प्रमाणात कचरा गोळा करून बुऱ्हाणनगर ग्रामपंचायतच्या कचरा गाडी द्वारे विल्हेवाट लावण्यात आली व परिसर स्वच्छ करण्यात आला, या मोहिमेत निरंकारी सेवादल सदस्य, सेवादल अधिकारी व अनुयायी सहभागी झाले होते. मोहिमेस अनेकांनी सदिच्छा भेट देवुन मिशनच्या या समाजोपयोगी उपक्रमाचे कौतुक केले. उल्लेखनीय म्हणजे संत निरंकारी मिशन वेळोवेळी समाजोपयोगी आणि पर्यावरण पूर्वक उपक्रमांमध्ये सक्रिय योगदान देत आले आहे. 'वननेस वन' अभियान अंतर्गत वृक्षारोपण आणि 'प्रोजेक्ट अमृतच्या' माध्यमातून जल संरक्षणाचे प्रयत्न हे मानव आणि निसर्ग यांच्यात सुसंवाद प्रस्थापित करणारे प्रभावी पाऊल ठरत आहेत.

# ई-कचऱ्याच्या निर्मूलनासाठी 'विचार भारती'चा पुढाकार कौतुकास्पद

## आ. संग्राम जगताप यांचे प्रतिपादन


विचार भारती व महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने ई कचरा संकलन व निर्मूलन अभियानाचे उद्घाटन करताना आमदार संग्राम जगताप. यावेळी महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, आयुक्त यशवंत डांगे, विचार भारतीचे मार्गदर्शक रवींद्र मुळे यांच्यासह नगरसेवक, व एनजीओसचे पदाधिकारी.

नगर – नगर शहर आता बदलत असून विकासाच्या दृष्टीने पाऊल टाकत आहे. आता महानगरपालिकेच्या माध्यमातून आग्रही भूमिका घेत काही कडक नियमावली व काही स्वरूपात बंदी घालण्याचे विचारधीन आहे. शहर स्वच्छ करण्याची जबाबदारी प्रत्येकाचीच आहे. संवेदनशील पणे सर्वांनी यामध्ये महापालिकेला सहकार्य करावे. ई कचरा समस्या पूर्ण जगाला भेडसावत आहे. आपल्या नगरमध्येही मोठ्या प्रमाणात ई कचरा असल्याने भविष्यात प्रत्येकाची डोकेदुखी वाढणार आहे. या ई कचऱ्याचे योग्य पद्धतीने निर्मूलन व्हावे यासाठी विचार भारतीने घेतलेला पुढाकार कौतुकास्पद आहे. भविष्यात नगर शहर फ्लेक्स मुक्त व्हावे यासाठी लवकरच जनरल बोर्ड मध्ये ठराव करावा. जे रस्त्यावर फ्लेक्स लावतील त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करा किंवा त्यांच्या प्रॉपर्टीवर टॅक्स चढवा. असे कडक निर्णय घेऊन शहरासाठी वाईटपणा घ्यावा लागणार आहे. इंदुर शहराप्रमाणे नगरशहर व्हावे यासाठी वेगवेगळे उपक्रम राबवले जाणार आहेत. महाराष्ट्रामध्ये नगर शहर सर्वात हरित शहर म्हणून पुढे येईल असे नियोजन करत आहोत, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी करून समाजिक जाणीवेतून काम करणाऱ्या विचार भारतीचे उपक्रम लोकांना मार्गदर्शक ठरत असल्याने या उपक्रमांमध्ये सर्वांनी सहभागी व्हावे. ई कचरा निर्मूलन हा उपक्रम अत्यंत उपयुक्त व महत्वपूर्ण आहे, असे सांगितले.

विचार भारती, महानगरपालिकांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर शहरात राबविण्यात येत असलेल्या ई कचरा संकलन व निर्मूलन अभियानाचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते प्रोफेसर कॉलनी चौकातील छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ आयोजित कार्यक्रमात झाले. यावेळी महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, आयुक्त यशवंत डांगे, विचार भारतीचे मार्गदर्शक रवींद्र मुळे, सचिव सुधीर लांडगे, ई कचरा निर्मूलन अभियानाचे प्रमुख उदय भणगे, बहुतांशी नगरसेवक, विचार भारतीचे सदस्य,मनपाचे अधिकारी, कर्मचारी, यांच्यासह विविध एनजीओ सामाजिक संस्था संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी नागरिकांनी उत्स्फूर्तपणे मोठ्या प्रमाणात विविध प्रकारच्या ई वस्तू येथे आणून दिल्या. त्यांचे संकलन यावेळी करण्यात आले.

आयुक्त यशवंत डांगे म्हणाले, महानगरपालिकेला माझी वसुंधरा अभियानामध्ये द्वितीय पारितोषिक मिळाले; याचे श्रेयामध्ये सर्व नागरिकांचे, महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांचा व अधिकाऱ्यांचा मोठा सहभाग आहे. आपले नगर शहर स्वच्छ, सुंदर, हरित व्हावे यासाठी महानगरपालिका प्रयत्नशील आहे. या उपक्रमांमध्ये नागरिकांनी स्वतः श्रमदान करून शहर स्वच्छ होण्यासाठी मदत करावी. भविष्यात काही नियमावली करण्यात येणार आहे. यामध्ये कुत्र्यांचा, डुकरांचा उपद्रव कमी व्हावा तसेच अतिक्रमण मुक्त शहर व्हावे यासाठी महानगरपालिका नियमावली करणार आहे.

महापौर ज्योती गाडे म्हणाल्या, विचार भारतीने सुरू केलेल्या विविध उपक्रमांमध्ये महानगरपालिकेचा सक्रिय सहभाग असणार आहे. ई-कचरा निर्मूलन उपक्रमामुळे नागरिकांमध्ये चांगली जनजागृती झाली आहे. असे उपक्रम कायम व्हावेत. महानगरपालिकेची जिथे जेव्हा गरज पडेल तेव्हा आम्ही बरोबर आहोत, असे आश्वासन दिले.

धनंजय जाधव म्हणाले, ईकचरा निर्मूलन ही एक मोठी समस्या आहे. या कचऱ्याचे योग्य पद्धतीने निर्मूलन करण्याचा विचार भारतीचा उपक्रम कौतुकास्पद आहे. विचार भारतीच्या अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांमध्ये महानगरपालिका कायम सहकार्य करत यशस्वी करू, असे सांगितले.

यावेळी महानगरपालिकेला माझी वसुंधरा अभियानात द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाल्याबद्दल रवींद्र मुळे यांनी महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांचे अभिनंदन करून आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते त्यांचा सत्कार केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविकात विचार भारतीचे उदय भणगे यांनी उपक्रमाची माहिती देऊन शहरामध्ये २५ ठिकाणी ई कचऱ्याचे संकलन झाले असून या उपक्रमांमध्ये ३० विविध एनजीओ व सामाजिक संस्थांचा सहभाग लाभला आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधीर लांडगे यांनी केले. नगरसेवक निखिल वारे यांनी आभार मानले.


सारडा महाविद्यालयाने व विद्यार्थ्यांनी ई कचरा संकलन अभियानात सहभाग घेतला. याप्रसंगी महापौर सौ. ज्योतीताई गाडे, प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित आदी.

# सारडा महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा ई कचरा संकलन अभियानात सहभाग

नगर – अहिल्यानगर शहरात विचार भारती संस्थेच्या वतीने राबवण्यात आलेल्या ई कचरा संकलन अभियानात पेमराज सारडा महाविद्यालय सहभागी झाले होते. महाविद्यालयातील जुणे संगणक व त्याचे साहित्य, विविध इलेक्ट्रिक वस्तू अशा अडगळीत पडलेल्या वस्तू या अभियानात जमा केल्या आहेत. तसेच महाविद्यालयातील प्राध्यापकांनी व विद्यार्थ्यांनीही केलेल्या आवाहनास सकारात्मक प्रतिसाद देत आपल्या घरून बंद पडलेल्या विविध ई-वस्तू महाविद्यालयात जमा केल्या हे या अभियानचे वैशिष्ट्ये. शहराच्या महापौर ज्योती गाडे यांच्या हस्ते जमा झालेल्या ई वस्तू विचार भारतीकडे सुपूर्द करण्यात आल्या, अशी माहिती पेमराज सारडा महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित यांनी दिली

पेमराज सारडा महाविद्यालयात विचार भारतीचे ई कचरा निर्मूलन अभियान राबवण्यात आले. यावेळी महापौर ज्योती गाडे, विचार भारतीचे राजाभाऊ मुळे, सुधीर लांडगे, उदय भणगे, पेमराज सारडा महाविद्यालयाचे चेअरमन डॉ.पारस कोठारी, प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित, उपप्राचार्य गिरीश पाखरे, प्रबंधक अशोक असेरी, पर्यवेक्षक राजू रिक्कल, समन्वयक प्रा.योगिता गावडे, प्रशांत आढाव, रोटरी क्लबच राजेश परदेशी, राहुल गांधी यांच्यासह प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. सर्व पाहुण्यांचा सत्कार महाविद्यायाच्या वतीने करण्यात आला.

या उपक्रमाचे महापौर ज्योती गाडे यांच्यासह हिंद सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक, सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष डॉ.रमेश झरकर, ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, प्रशासकीय अधिकारी सुमतीलाल कोठारी व चेअरमन डॉ.पारस कोठारी यांनी कौतुक केले आहे.

# इ-कचरा संकलन अभियानात 'जाणीव फाऊंडेशन'चा पुढाकार


इ – कचरा संकलन अभियानात ॲड. विक्रम वाडेकर, सतीश शिंदे, प्रदीप वाखुरे, करण कराळे, अशोक गायकवाड, प्रा. संजय पाटील, सुरेश खामकर, निखिल वारे, उपमहापौर धनंजय जाधव, ॲड. व इंजि.कैलाश दिघे.

नगर – स्वच्छता, सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या संत गाडगे बाबा यांच्या जयंतीचे औचित्य साधून शहरात इ-वेस्ट संकलन अभियानाचे आयोजन करण्यात आले. शहरात वाढत्या इलेक्ट्रॉनिक कचऱ्याच्या (इ-वेस्ट) समस्येवर प्रभावी उपाय म्हणून महापालिकेच्या वतीने, पूर्णम इको फाऊंडेशन आणि विचार भारती यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. या अभियानात जाणीव फाऊंडेशनने सक्रीय व जबाबदारीपूर्वक सहभाग नोंदवत प्रोफेसर कॉलनी येथील मुख्य संकलन केंद्राची जबाबदारी स्वीकारली.

फाऊंडेशनच्या आवाहनाला नागरिकांकडून प्रतिसाद मिळाला. एकूण ३५ कुटुंबांनी सहभाग घेत जवळपास ४३९ लहान-मोठ्या इलेक्ट्रॉनिक वस्तू इ-वेस्ट म्हणून जमा केल्या. यामध्ये एलईडी टीव्ही, कॉम्प्युटर, यूपीएस, मोबाईल फोन, चार्जर, इन्व्हर्टर, स्टॅबिलायझर, मिक्सर, व्हीसीआर, रेडिओ, कॅमेरे, टॉर्च, इलेक्ट्रिक इस्त्री, ड्रायर, विविध केबल्स व इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा समावेश होता. घराघरांत पडून असलेल्या या वस्तू योग्य पद्धतीने पुनर्वापर व विल्हेवाटीसाठी पाठविण्यात आल्या.

या उपक्रमाचे विशेष वैशिष्ट्य म्हणजे, जमा झालेल्या वस्तूंमधील दुरुस्त होऊ शकणाऱ्या वस्तू दुरुस्त करून त्या गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शैक्षणिक उपयोगासाठी देण्यात येणार आहेत. यामुळे पर्यावरण संवर्धनाबरोबरच सामाजिक बांधिलकीही जपली जाणार आहे. तसेच, उर्वरित इ-वेस्टची वैज्ञानिक व अधिकृत प्रक्रियेद्वारे विल्हेवाट लावण्यात येणार असून हा धोकादायक कचरा खत, माती, वायू किंवा पाण्याच्या माध्यमातून अन्नसाखळीत प्रवेश करणार नाही व कार्बन उत्सर्जन होणार नाही, याची विशेष काळजी घेतली जाणार आहे. कारण अशा प्रकारे विषारी घटक अन्नसाखळीत आल्यास मानवाच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊन दुर्धर आजारांना सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे योग्य व्यवस्थापन ही काळाची गरज असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.

अभियानाचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महापौर ज्योती अमोल गाडे, उपमहापौर धनंजय जाधव, आयुक्त यशवंत डांगे, नगरसेवक तसेच पूर्णम इको फाऊंडेशन व विचार भारतीचे प्रतिनिधी उपस्थित होते. विचार भारतीचे राजाभाऊ मुळे, सुधीर लांडगे, उदय भणगे आदींनीही उपस्थिती लावून उपक्रमास पाठिंबा दर्शविला.

या वेळी सजग नागरिकांनी उपस्थित राहून पर्यावरणाबाबतची आपली जबाबदारी अधोरेखित केली. हे अभियान यशस्वी करण्यासाठी जाणीव फाऊंडेशनचे दीपक भंडारी, प्रदीप वाखुरे, ॲड. विक्रम वाडेकर, विकास गायकवाड, विकास जोशी आणि ॲड. व इंजिनिअर कैलाश दिघे यांनी परिश्रम घेतले.

इ-वेस्टचे योग्य व्यवस्थापन, पुनर्वापर आणि पुनर्निर्मिती यामुळे पर्यावरण संरक्षणास चालना मिळत असून, संत गाडगे बाबा यांच्या स्वच्छता व समाजप्रबोधनाच्या विचारांना साजेसा हा उपक्रम ठरला. भविष्यातही अशा उपक्रमांना अधिकाधिक प्रतिसाद मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.




लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शाळेचे विद्यार्थी स्टुडन्ट टॅलेंट सर्च परीक्षेत जिल्हा व केंद्र स्तरावरील गुणवत्ता यादीत चमकल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

# लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शाळेचे स्टुडन्ट टॅलेंट सर्च परीक्षेत यश

## तब्बल ४६ विद्यार्थी जिल्हा व केंद्र स्तरावरील गुणवत्ता यादीत चमकले

नगर – रयत शिक्षण संस्था संचलित कापड बाजार येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील शाळेने स्टुडन्ट टॅलेंट सर्च परीक्षेत यश संपादन करत शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा पुन्हा एकदा अधोरेखित केली. शाळेतील तब्बल ३२ विद्यार्थी जिल्हा गुणवंत यादीत, तर १४ विद्यार्थी केंद्र गुणवत्ता यादीत चमकले असून, एकूण ४६ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीत स्थान मिळवून शाळेचा नावलौकिक वाढविला आहे.

गुणवंत विद्यार्थ्यांचा शाळेत सत्कार करण्यात आला. या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य दादाभाऊ कळमकर, जनरल बॉडी सदस्य ज्ञानदेव पांडुळे, विभागीय अधिकारी नवनाथ बोडखे, सविभागीय अधिकारी बाबासाहेब नाईकवाडी, प्रमोद तोरणे, प्राचार्या छाया काकडे, मुख्याध्यापिका लक्ष्मी आहेर, तसेच पालक संघ व शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यांनी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

या विद्यार्थ्यांना मीनाक्षी खोडदे, उर्मिला साळुंके, सुजाता दोमल, शितल रोहकले, जयश्री खांदोडे, सोनाली अनुभुले, रूपाली वाबळे, भाग्यश्री लोंढे, भारती सुसरे, इंदुमती दरेकर, कांचन मदने, पुनम धाडगे, रूपाली पांडुळे या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

**जिल्हा गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांची कामगिरी**

इयत्ता पहिली – ओजस्वी भोरे व संस्कृती वायकर (जिल्ह्यात दुसरी), अपूर्व बडवे, शौर्य कांडेकर, चिरायू जाधव (जिल्ह्यात चौथा), अनन्या देवकर, आर्वी चौरे, जेसिएल कसोटे, वेद खराडे (जिल्ह्यात पाचवा), समृद्धी राजळे, अनिश गोरे, शौर्य पठारे, अन्वित इंगुले (जिल्ह्यात सहावा), शुभ्रा साळुंके (जिल्ह्यात सातवी).

इयत्ता दुसरी – स्वरव अनभुले, कैवल्य गारुडकर (जिल्ह्यात चौथा), कोहक सान्वी, अद्रिका गाडीलकर (जिल्ह्यात पाचवी), रुद्र हिंगे, सिध्दी पवार, ज्ञानश्री नवले (जिल्ह्यात सहावी), सान्वी पवार, स्वराज लांडगे, आयुष गंभीरे (जिल्ह्यात सातवा).

इयत्ता तिसरी – रुद्र गुंजाळ (जिल्ह्यात दुसरा), श्रीराज गुंजाळ (जिल्ह्यात चौथा), आराध्या जाधव (जिल्ह्यात पाचवी), गायत्री कडूस (जिल्ह्यात चौदावी), शांभवी हंबर्डे (जिल्ह्यात पंधरावा), वेदांत अंधारे (जिल्ह्यात सतरावा).

इयत्ता चौथी – राजनंदिनी गांगर्डे (जिल्ह्यात पंधरावी), स्वरा दरेकर (जिल्ह्यात सतरावी).

**केंद्रस्तर गुणवत्ता यादीतील विद्यार्थ्यांची कामगिरी**

इयत्ता पहिली – ईश्वरी साबळे, नेहूल दारकुंडे, शिवराज जगताप (प्रथम), श्रेयस पाटेकर (द्वितीय).

इयत्ता दुसरी – काव्या शेंडे, रुद्रांश फलके, राजदीप पिंपळे (प्रथम), सान्वी ठाणगे, सान्वी राशीनकर, समर्थ वायभासे (द्वितीय).

इयत्ता तिसरी – श्रुती फसले (प्रथम), युवराज भोर (द्वितीय).

इयत्ता चौथी – शिवम दरेकर, विराज काटमोरे (प्रथम).

# उद्योजक सुजित सरफळे यांचा सह्याद्री रत्न पुरस्काराने गौरव

नगर – येथील उद्योजक सुजित बाळाराम सरफळे यांना सह्याद्री रत्न पुरस्काराने गौरविण्यात आले. शिवजयंती निमित्त आंतरराष्ट्रीय मानवाधिकार न्यायिक सुरक्षा परिषद पिंपरी चिंचवड (जि. पुणे) आणि स्वराज्य फिल्म प्रोडक्शन संघटना (महाराष्ट्र राज्य) यांच्या वतीने सरफळे यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



उद्योजक सुजित बाळाराम सरफळे यांना सह्याद्री रत्न पुरस्काराने गौरविण्यात आले.



या सन्मान सोहळ्याप्रसंगी सहाय्यक पोलीस आयुक्त सुनील हिरुरकर, एअर फोर्स (वायुसेना) टेक्निकल ऑफिसर सुरेश पोखरकर, राहुल शिंदे, अभिनेत्री मृणाल कुलकर्णी, निर्माता आणि दिग्दर्शक बाळासाहेब बांगर, उमेश बांदल, भाग्यदेव घुले, अभिनेते प्रशांत तपस्वी, देव झुंबरे, जगदीश सांधानशिव, काजल शिंदे आदी उपस्थित होते.

महाराष्ट्रातील कलाकार, साहित्यिक, उद्योजक आणि सामाजिक कार्यकर्ते यांच्या कार्याला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गिरीश राजुरकर, उपाध्यक्ष राजेंद्र ठोंबरे, सचिव मंगेश कसबे आणि खजिनदार सिद्धार्थ शिंदे यांनी या सोहळ्याचे आयोजन केले होते.

सुजित बाळाराम सरफळे हे इम्पेक्स प्रॉपर्टीजचे संस्थापक असून ते रिअल इस्टेट क्षेत्रातील एक दूरदृष्टी असलेले, विश्वासार्ह व प्रेरणादायी उद्योजक म्हणून ओळखले जातात. अत्यंत साध्या सुरुवातीपासून त्यांनी कठोर परिश्रम, सातत्य आणि प्रामाणिकपणाच्या बळावर इम्पेक्स प्रॉपर्टीज ही एक विश्वासार्ह रिअल इस्टेट ब्रँड म्हणून उभी केली आहे. या माध्यमातून त्यांनी अनेक होतकरु युवक–युवतींना रोजगार देखील उपलब्ध करुन दिला आहे.

ग्राहकाचा विश्वास हीच खरी संपत्ती या तत्त्वावर काम करत त्यांनी अनेक गुंतवणूकदारांचे स्वप्न सुरक्षित आणि यशस्वी गुंतवणुकीत रूपांतरित केले आहे. त्यांचे कार्य, चिकाटी आणि सामाजिक जबाबदारी याची दखल घेऊन आज त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

# पुण्य प्राप्तीसाठी परमात्म्याची सतत मनोभावे पूजा करा

## सारसनगर येथे साध्वीजींचे अनमोल मार्गदर्शनपर प्रवचन

नगर – सारसनगर येथील विवांता सोसायटी येथे महासती जिनशासन गौरव पूज्य महासाध्वी सुनंदाजी म.सा. यांच्या पावन सान्निध्यात श्री शूभदाजी म.सा., श्री भार्वीजी म.सा. यांनी अनमोल असे सुंदर प्रवचन दिले. साध्वीजींनी सांगितले की, जीवन चांगल्या पद्धतीने जगायचे तर प्रत्येकाच्या आयुष्यात तीन 'पी' महत्वाचे आहेत.



पहिला पी म्हणजे पैसा – पैसा आवश्यकता, गरजा पूर्ण करण्यासाठी कमवा, दु:ख वाढवण्यासाठी नाही. परिवार, समाजासाठी पैसा महत्त्वाचा आहे पण त्याला एक मर्यादा असावी. पैशाने सुख मिळते पण सुख खरेदी नाही करता येत. त्यामुळे पैसा तितकाच कमवा ज्यामुळे आपण आनंदी राहू शकतो.

दुसरा पी म्हणजे पुण्य – पुण्य हे लक्ष्मीचे बंधू आहे. जिथे भाऊ राहतो तिथेच बहिणही राहते. ज्या घरात पुण्य राहते तिथेच लक्ष्मी वास करते. जोपर्यंत भगवान श्रीकृष्णांच्या द्वारका नगरीत पुण्य प्रभाव होता तोपर्यंत ती नगरी सोन्याची होती. ज्या दिवशी पुण्य प्रभाव कमी झाला तेव्हा पासून नगरीचा विनाश सुरू झाला. यासाठीच प्रत्येक क्षणी पुण्य कर्म केले पाहिजे म्हणजे लक्ष्मी सुद्धा आनंदाने तुमच्या जवळ राहील.

तिसरा पी म्हणजे परमात्मा – पुण्य केले तर पैसा मिळतो आणि परमात्मा दर्शन झाले तर पुण्य प्राप्त होते. आपण कसे चालतो, कसे बोलतो, कसे राहायचे हे परमात्मा शिकवतो. समोर जीवनाचा अंत दिसत असतानाही सुदर्शन शेठ परमात्म्याच्या भेटीसाठी घरातून बाहेर पडले. समोर अर्जुन मालीच्या रूपात मृत्यू उभा होता. परंतु परमात्म्यावर नितांत श्रद्धा असल्याने त्यांनी स्वतःसह अर्जुन मालीचीही गती सुधारली.

संकल्प करा की, परमात्म्याची इतकी मनोभावे पूजा करा की आपल्या पुण्याचा उदय होऊन लक्ष्मी कायम तुमच्या घरावर कृपा करेल. दररोज किंवा आठवड्यातून एकदा सहपरिवार आनंदधाम येथे जाऊन आचार्य आनंदऋषीजी महाराज भगवंताचे दर्शन करून पुण्य कर्म वाढवत राहा.

# माझी वसुंधरा अभियानात उत्कृष्ट कामगिरीबद्दल अहिल्यानगर जिल्हा परिषदेचा गौरव

## पर्यावरणमंत्र्यांच्या हस्ते जिल्हा परिषदेला द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार

नगर – राज्य शासनाच्या 'माझी वसुंधरा अभियान ४.०' मध्ये उत्कृष्ट कामगिरी करत अहिल्यानगर जिल्हा परिषदेने राज्य स्तरावर द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार पटकावला आहे. वरळी येथील सरदार वल्लभभाई पटेल स्टेडियमच्या डोममध्ये आयोजित सोहळ्यात राज्याच्या पर्यावरण, वातावरणीय बदल व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी हा मानाचा सन्मान स्वीकारला.




राज्य शासनाच्या 'माझी वसुंधरा अभियान ४.०' मध्ये उत्कृष्ट कामगिरी करत अहिल्यानगर जिल्हा परिषदेने राज्य स्तरावर द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार पटकावला आहे.

माझी वसुंधरा अभियान ५.० मध्येही अहिल्यानगर जिल्हा परिषदेने नाशिक विभागात सर्वोत्तम कामगिरी केली आहे. आता चालू असलेल्या माझी वसुंधरा अभियान ६.० मध्ये जिल्हा परिषदेने मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात प्रथम क्रमांक मिळविण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यासाठी सर्व पदाधिकारी, अधिकारी व नागरिकांना सोबत घेऊन सूक्ष्म नियोजन केले जात असून अहिल्यानगर जिल्ह्याचा राज्यात नावलौकिक निर्माण करण्याचा मानस नोडल अधिकारी राजेंद्र देसले यांनी व्यक्त केला.

या माझी वसुंधरा अभियान सन्मान सोहळा २०२६ प्रसंगी राज्याचे राज्यपाल आचार्य देवव्रत, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, विधानसभा अध्यक्ष

अ‍ॅड. राहुल नार्वेकर, राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव देवेंद्र सिंग आदी उपस्थित होते.

मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्यासोबत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, माझी वसुंधरा अभियानाचे नोडल अधिकारी राजेंद्र देसले व जिल्हा समन्वयक रवींद्र ठाणगे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

या सोहळ्यात राज्यपालांनी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना नैसर्गिक शेती कशा प्रकारे करावी व ती जीवनशैलीसाठी किती महत्त्वाची आहे, याचे महत्त्व पटवून दिले. तसेच मंत्री पंकजा मुंडे यांनी दैनंदिन जीवनात बदल करून शाश्वत जीवनशैली अंगीकारण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रोत्साहन दिले. यावेळी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उत्कृष्ट कामाची दखल घेणाऱ्या माझी वसुंधरा अभियानाचे कॉफी टेबल बुक व द क्लायमेट चेंज लेक्सिकॉन या दोन्ही पुस्तकांचे अनावरण करण्यात आले.

# मार्कशीटआधीच 'जॉब ऑफर लेटर' हातात

## आय.एम.एस. च्या एम.बी.ए., एम.सी.ए.चे विद्यार्थी व प्लेसमेंटची कौतुकास्पद कामगिरी

नगर – इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेन्ट स्टडीज करिअर डेव्हलपमेंट अ‍ॅण्ड रिसर्च म्हणजेच आय.एम.एस. मधील एम.बी.ए. तसेच एम.सी.ए. विध्यार्थ्यांना शेवटचे वर्ष ऊत्तीर्ण होण्याआधीच जॉब लेटर हाती मिळाले आहे. अशा पद्धतीने त्यांना प्री प्लेसमेंट ऑफर देण्यात आलेली आहे.



प्लेसमेंट मिळालेल्या विद्यार्थ्यांमध्ये प्रामुख्याने अनिकेत अमृते, शिवानी टाक – पोलाद स्टील, खुशी अरोरा – आय सी आय सी आय बँक, पायल आव्हाड – ईटॉन, सारा चाबुकस्वार – एल टी आय माईंड्ट्री, शोएब शेख – अशोक लेलँड, श्रेया कानडे – अहमदनगर मर्चन्ट बँक, श्रेया सामल / साक्षी बिज्ञा – निर्मल बंग सिक्युरिटीज, शुभम पालवे – स्टान्झा लिविंग, शुभम कासव – बजाज फायनान्स, निकिता करपे / अभिषेक यादव / आनंद कोकाटे – अडसूळ टेक्निकल कॅम्पस, अभिषेक लोखंडे / अविनाश अजबे / शुभम कोन्हाळे – कनक डिजिफ्लेक्स, श्रद्धा अकोलकर – ट्रेफिड ए आय, शार्जील खान / रिफअत बागवान / युसूफ शेख – अरहम आय टी सॉफ्टवेअर यांचा समावेश आहे.

इन्स्टिटयूट ची गुणवत्ता, तज्ज्ञ शिक्षक आणि 'स्टुडन्ट फर्स्ट' या धोरणांमुळे तसेच आय.एम.एस. चा सतत कॉलिटी एज्युकेशन वर भर असल्यामुळे मुलांना चांगल्या कंपनीज मध्ये प्लेसमेंट मिळाले आहे. राष्ट्रीय, जागतिक कीर्तीच्या कंपन्यामध्ये मुलांची निवड झाली आहे.

त्याचप्रमाणे येत्या १० मार्च रोजी एम.बी.ए./एम.सी.ए. च्या विद्यार्थ्यांसाठी टी. सी. एस. कंपनी चा कॅम्पस रिक्रुटमेंट ड्राईव्ह होणार आहे. या मध्ये एम.बी.ए. साठी ६ लाख तर एम.सी.ए. साठी ११.८ लाखांचा पॅकेज मिळणार आहे. अशी माहिती प्लेसमेंट सेल चे प्रा. सुरेश खन्ना यांनी दिली.

संस्थेच्या वतीने डायरेक्टर डॉ.एम. बी. मेहता, डेप्युटी डायरेक्टर डॉ. विक्रम बार्नबस, एम.बी.ए. विभाग प्रमुख डॉ. प्रणोती तेलोरे, एम. सी.ए. विभाग प्रमुख डॉ. महेश पोतदार यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. तसेच प्रा. सुरेश खन्ना यांचे कौतुक केले.

नुकतीच एमबीए व एमसीए सीईटी परीक्षा रजिस्ट्रेशन झाली असून एप्रिल, मे महिन्यात या परीक्षा होणार आहेत. या संदर्भात कुणालाही काहीही माहिती हवी असल्यास एमबीए साठी डॉ. सय्यद मुदस्सर (९८८१४५८५७९) व एमसीए साठी डॉ. संजय भक्कड (९८५०५८५५५१) यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे बीबीए संदर्भात माहिती जाणून घेण्यासाठी डॉ. भावसार (९९६०४५९६४७) व बीसीए संदर्भात माहिती हवी असल्यास डॉ. सय्यद (९८२३१००७५६) यांच्याशी संपर्क साधावा.



सावेडी उपनगरात 'दियारा १ ग्रॅम ज्वेलरी'चे उद्घाटन करण्यात आले.

# सावेडी उपनगरात 'दियारा १ ग्रॅम ज्वेलरी'चे उद्घाटन

नगर – सावेडी उपनगरातील भिस्तबाग महाल परिसरातील पवननगर भागात 'दियारा १ ग्रॅम ज्वेलरी' या नव्या दागिन्यांच्या शोरूमचे उद्घाटन झाले. घरातून ज्वेलरी व्यवसायाची सुरुवात करून गेल्या चार ते पाच वर्षांत जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या बळावर 'साई लेडी शॉपी' या दुकानाची यशस्वी स्थापना करण्यात आली. महिला वर्गाकडून मिळालेल्या प्रतिसादामुळे व्यवसायाचा विस्तार करत 'दियारा १ ग्रॅम ज्वेलरी' या नवीन शोरूमची उभारणी करण्यात आली आहे.

या शोरूमचे उद्घाटन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. यावेळी शिवभक्त प्रतिष्ठानचे अनिकेत घुले, मातोश्री हॉटेलचे संचालक मनोज सुरवसे, शिवजल सिटीचे संचालक सचिन भोसले, रेणुकाई कन्स्ट्रक्शनचे प्रवीण वारे, भाग्यश्री हॉटेलचे संचालक नागेश मडके, नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, पै. महेश लोंढे, राहुल तावरे, नगरसेविका सौ. दिपालीताई बारस्कर, श्रीमती शारदाताई ढवण, सौ. किरणताई बारस्कर, सौ. मीराताई बारस्कर, उपप्राचार्य गोरक्षनाथ चौकडे, दीपक बापू तावरे, सूत्रसंचालक उद्धव काळाफहाड तसेच 'दियारा १ ग्रॅम ज्वेलरी'च्या संचालिका सौ. दिपाली चौकडे, राजू रघुनाथ चौकडे, हर्षद चौकडे आणि समस्त चौकडे परिवार उपस्थित होते.

'दियारा – १ ग्रॅम ज्वेलरी'मध्ये ग्राहकांसाठी पारंपरिक तसेच आधुनिक डिझाईन्समधील नेकलेस सेट, कानातले, बांगड्या, अंगठ्या, मंगळसूत्र यांची विस्तृत आणि आकर्षक रेंज उपलब्ध करून देण्यात आली आहे.

कमी किमतीत सोन्यासारखा देखावा देणारे आणि दर्जेदार दागिने उपलब्ध करून देणे हा शोरूमचा मुख्य उद्देश असल्याचे संचालकांनी सांगितले.



शांतिनिकेतन कॉलेज ऑफ फार्मसीचे मॅकलॉईड कंपनीमध्ये निवड झालेले विद्यार्थी.

# 'शांतिनिकेतन फार्मसी'च्या विद्यार्थ्यांची 'मॅकलॉईड'मध्ये निवड

नगर – औषधनिर्माण क्षेत्रात करिअरच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या मेगा पूल कॅम्पस ड्राइव्हमध्ये शांतिनिकेतन कॉलेज ऑफ फार्मसी, धोत्रे बु., अहमदनगर येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

एन.एन.सथ्था कॉलेज ऑफ फार्मसी, अहमदनगर येथे २३ फेब्रुवारी रोजी मेगा पूल कॅम्पस ड्राइव्हचे आयोजन करण्यात आले होते. बहुराष्ट्रीय औषधनिर्माण कंपनी मॅकलॉईड फार्मास्युटिकल्स यांच्या वतीने आयोजित या प्लेसमेंट प्रक्रियेत महाविद्यालयातील एकूण १० विद्यार्थ्यांची गुणवत्ता नियंत्रण (क्वालिटी कंट्रोल) व उत्पादन (प्रोडक्शन) विभागासाठी निवड झाली आहे.

सदर मेगा कॅम्पस ड्राइव्हमध्ये लेखी परीक्षा, तांत्रिक मुलाखत व वैयक्तिक मुलाखत अशा विविध टप्प्यांद्वारे विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. विद्यार्थ्यांनी शैक्षणिक गुणवत्ता, तांत्रिक ज्ञान, संवादकौशल्य व औद्योगिक दृष्टीकोन यांचे उत्कृष्ट प्रदर्शन करून ही संधी मिळवली.

गुणवत्ता नियंत्रण (QC) विभागासाठी निवड झालेले विद्यार्थी : ओंकार ब्रह्मणे, सुमित सोनवणे, वैभव श्रीराम आणि सचिन शिंगाडे. तसेच उत्पादन (Production) विभागासाठी निवड झालेले विद्यार्थी : अर्जुन राठोड, अक्षय रूपनार, मुजाहिद शेख, संदीप नागरगोजे, अजित गायकवाड आणि वैभव येडे.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. प्रशांत शिंदे, सचिव सौ. सोनाली शिंदे, प्राचार्य डॉ. जयदीप पवार तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग आणि प्रशिक्षण व प्लेसमेंट सेल यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# अहिल्यानगरचे डॉ. संजय घोगरे राज्याचे सर्वोत्कृष्ट जिल्हा शल्यचिकित्सक

नगर – महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने दिला जाणारा 'वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न व महाआरोग्य सन्मान २०२६' हा अतिउत्कृष्ट जिल्हा शल्यचिकित्सक या प्रथम क्रमांकाचा पुरस्कार अहिल्यानगरचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय घोगरे यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. मुंबईतील वाय. बी. चव्हाण सेंटर येथे २२ फेब्रुवारी रोजी झालेल्या सोहळ्यात त्यांना या सर्वोच्च पुरस्काराने गौरवण्यात आले.



'वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न व महाआरोग्य सन्मान २०२६' हा अतिउत्कृष्ट जिल्हा शल्यचिकित्सक या प्रथम क्रमांकाचा पुरस्कार जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय घोगरे यांना प्रदान करताना सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आदी.

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव ई. रवींद्र, आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, संचालक डॉ. विजय कंदेवाड व राज्यस्तर सहसंचालक डॉ. सुनीता गोल्हाईत यांच्या प्रमुख उपस्थितीत पुरस्कार वितरण सोहळा पार पडला.

आरोग्य विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजना तसेच दैनंदिन कामकाजाच्या बाबी जसे की आंतररुग्ण, बाह्यरुग्ण, विविध शस्त्रक्रिया, सिझेरियन शस्त्रक्रिया, प्रसूती, मातामृत्यू व अर्भकमृत्यू अशा विविध निकषांच्या आधारे राज्यस्तरीय समितीमार्फत रुग्णालयांचे गुणांकन करण्यात आले. या कठोर प्रक्रियेतून महाराष्ट्रातील प्रथम तीन उत्कृष्ट संस्थांची निवड करण्यात आली असून त्यामध्ये अहिल्यानगरच्या जिल्हा सामान्य रुग्णालयाने प्रथम क्रमांक पटकावला.

डॉ. संजय घोगरे यांनी जिल्हा शल्यचिकित्सक पदाची सूत्रे हाती घेतल्यापासून कामकाजाचे उत्कृष्ट नियोजन केले. त्यांनी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये सुसूत्रता आणत त्यांच्यात सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण केली. या योगदानाची दखल घेत त्यांना व त्यांच्या संस्थेला या मानाच्या पुरस्काराने गौरवण्यात आले आहे.

**कर्नाटकातील एका गरीब शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या एका तरुणाची प्रेरणादायी कहाणी आहे. त्याला त्याचे ध्येय गाठण्यापूर्वी अनेक अडचणींचा सामना करावा लागला. कधीकधी परिस्थितीमुळे त्याला उदरनिर्वाहासाठी विचित्र नोकऱ्या कराव्या लागल्या; परंतु त्याने स्वत:ला आणि त्याच्या स्वप्नांना कधीही हार मानू दिली नाही. हॅपिलोचे संस्थापक आणि सीईओ विकास धनमल नाहर यांची ही कथा आहे.**

# चिकाटीच्या जोरावर ५०० कोटींची झेप

अचिव्हर

अनेक अडचणींनंतर त्यांनी स्वतःची छोटी कंपनी सुरू केली. कोविड-१९ साथीच्या आजाराने व्यवसायात हळूहळू तोटा वाढत होता. लाखो रुपये किमतीचा माल गोदामात पडून होता. त्या तरुणाने आवश्यक वस्तू पुरवण्याची परवानगी मागण्यासाठी आयुक्तांकडे संपर्क साधला तेव्हा त्याला सांगण्यात आले की सुकामेवा आवश्यक वस्तूंमध्ये सूचीबद्ध नाही. आता त्याच्यासमोर सर्वात मोठा प्रश्न होता, की त्याच्या कर्मचाऱ्यांना पैसे कसे द्यायचे. हार मानण्याऐवजी त्याने आपला विचार बदलण्याचा निर्णय घेतला. त्याने ई-कॉमर्सचा मार्ग स्वीकारला आणि त्याची उत्पादने ऑनलाइन विकण्यास सुरुवात केली. हा निर्णय त्याच्या नशिबातला टर्निंग पॉइंट ठरला. सततचे कठोर परिश्रम, सुदृढ धोरण आणि कधीही हार न मानण्याच्या वृत्तीमुळे केवळ दहा हजार रुपयांपासून सुरू झालेल्या विकास यांच्या कंपनीची उलाढाल आता ५०० कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे.

स्वप्ने तुटली की मरत नाहीत, तर ती सोडून दिल्यावर मरतात, असे विकास सांगतात. १९८४ मध्ये जन्मलेल्या विकासच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह कॉफी आणि मिरची शेतीवर अवलंबून होता. शेतीनेच त्याला संयम आणि संघर्षाचे पहिले धडे दिले. त्याचे वडील धनमल नाहर कॉफी आणि मिरचीचा व्यापार करत होते. त्यामुळे विकासला लहानपणापासूनच व्यवसायाची मूलभूत समज मिळाली. विकासने त्याचे सुरुवातीचे शिक्षण गावातील शाळांमध्ये पूर्ण केले. मर्यादित संसाधने असल्यामुळे तो पुढील शिक्षणासाठी बेंगळुरू विद्यापीठात गेला आणि २००५ मध्ये संगणक शास्त्रात पदवी प्राप्त केली. शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्याने एका मोठ्या कंपनीत वरिष्ठ आयात व्यवस्थापक (आशिया) म्हणून तीन वर्षे काम केले. स्थिर नोकरी असूनही विकास समाधानी नव्हता. कारण त्याला स्वत:ची छाप पाडायची होती. म्हणून त्याने नोकरी सोडली आणि त्याच्या स्वप्नांना दिशा देण्यासाठी पुण्याच्या सिम्बायोसिस विद्यापीठातून एमबीए करण्याचा निर्णय घेतला. येथूनच त्याचा उद्योजकीय प्रवास सुरू झाला. शिकलेले धडे कामी आले.

एमबीए करताना विकासची निवड एका प्रसिद्ध बँकेत कॅम्पस प्लेसमेंटद्वारे झाली. तथापि, त्याने अवघ्या सहा महिन्यांनंतर नोकरी सोडली. त्यानंतर त्याने जवळजवळ साडेचार वर्षे एका स्टार्टअपमध्ये व्यवस्थापकीय संचालक म्हणून काम केले. या कंपनीने सुकामेवा सारख्या आरोग्य उत्पादनांवर लक्ष केंद्रित केले. तिथून मिळालेल्या अनुभवाने आणि धड्यांमुळे तो व्यवसायासाठी तयार झाला. शेवटी त्याने स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचा निर्णय घेतला. दोन कर्मचाऱ्यांसह प्रवास सुरू झाला. विकासला व्यावसायिक कौशल्याचा वारसा मिळाला असला, तरी त्याला हॅपिलो ही कंपनी सुरू करताना असंख्य अडचणी आल्या. त्याने आपली कल्पना गुंतवणूकदारांसमोर मांडली तेव्हा त्याला नेहमीच निराशा सहन करावी लागली. या संघर्षादरम्यान तो किरकोळ विक्रेता आणि वितरक म्हणूनही काम करत होता. गुंतवणूकदार मागे हटले तेव्हा विकासने त्याच्या स्वतःच्या बचतीतील फक्त दहा हजार रुपये आणि दोन कर्मचाऱ्यांसह हॅपिलो सुरू केले. नंतर त्याच्या पत्नीने वीस लाख रुपये कर्ज घेऊन गुंतवणूक केली. नंतर त्यांना सरकारच्या सीजीटीएमसीइ योजनेअंतर्गत ७५ लाख रुपयांचा निधी मिळाला. त्यामुळे कंपनीच्या विकासाचा पाया मजबूत झाला. हॅपिलो हा केवळ एक ब्रँड नाही तर भारतीय उद्योगात एक प्रेरणादायी उदाहरण आहे. पॅकेज केलेल्या ड्रायफ्रुट्सच्या ४० हून अधिक प्रकार, १०० हून अधिक चॉकलेट प्रकार आणि ६० हून अधिक मसाल्यांसह कंपनीने आरोग्य आणि चव या दोन्ही बाबतीत स्वतःचे वेगळेपण सिद्ध केले आहे. आज पाचशे कोटी रुपयांहून अधिक उलाढालीसह, विकास हा दूरदर्शी नेतृत्व आणि नावीन्यपूर्णतेचे उदाहरण आहे. फोर्ब्स आणि टाइम्सच्या ४० अंडर ४० यादीत स्थान आणि असंख्य प्रतिष्ठित पुरस्कार हे विकासच्या चिकाटी आणि कठोर परिश्रमाचे दाखले आहेत.






## फंडू एसएमएस


नजरें मिली तो बेख्याल हो गए, नजरें झुकी तो सवाल हो गए, और इतना घुमाया उसने प्यार में, कि शॉपिंग कराते कराते कंगाल हो गए।

अगर हो वक्त तो मुलाकात किजीए, दिल कुछ कहना चाहे तो कुछ बात किजिए, यूँ तो मुश्कील है हमसे दूर रहना, पर एक लम्हा मिले तो हमें याद किजिए।

दिन भर भटकते रहते हैं अरमान तुझसे मिलने के, न ये दिल ठहरता है, न तेरा इंतजार रुकता है।

## फॅशन पॅशन

### पुरुषांच्या फॅशनमध्ये नवा ट्रेंड




पुरुषांच्या फॅशनमध्ये भरतकामाची लोकप्रियता वाढत आहे. कारण मुले काहीतरी वेगळे शोधतात. भरतकाम हे ऐतिहासिकदृष्ट्या पारंपारिक आशियाई आणि मध्य पूर्वेकडील कपड्यांमध्ये तसेच पाश्चात्य फॅशनमध्ये एक प्रमुख स्थान राहिले आहे; परंतु पॅरिस, मिलान किंवा न्यू यॉर्कमध्ये आधुनिक पुरुषांच्या शर्ट, बॉम्बर जॅकेट किंवा ब्लेझरवर ते वाढत्या प्रमाणात दिसून येत आहे. डायर, डोल्से गब्बाना, केन्झो आणि गुची येथील डिझायनर्सनी अलिकडच्या रनवे शोमध्ये ते स्वीकारले आहे, तर लुई व्हिटॉनचे सेलिब्रिटी रॅपर-डिझायनर फॅरेल विल्यम्स यांनी देशाच्या भेटीनंतर त्यांचे संपूर्ण जून कलेक्शन भारताला समर्पित केले आहे.

दिल्लीस्थित कार्डो या ब्रँडच्या संस्थापिका रिक्की खेर म्हणतात, हाताने विणलेल्या कापडांमध्ये किंवा गुंतागुंतीच्या भरतकामात पुरुषांमध्ये वाढती आवड सामाजिक बदल आणि उद्योगाची नावीन्यपूर्ण इच्छा दोन्ही दर्शवते. पुरुषांच्या फॅशनमध्ये भरतकाम हँडबॅग्ज आणि दागिन्यांसह समान मार्ग अवलंबत आहे. अलिकडच्या वर्षांत फॅशन उद्योगाच्या पारंपारिक लिंग रेषा अस्पष्ट केल्या आहेत. हा उत्साह वर्कवेअर किंवा शांत लक्झरी सारख्या ट्रेंडमध्ये रस नसल्याचे देखील प्रतिबिंबित करतो. मुले काहीतरी वेगळे शोधत असतात. ते स्वतःला थोडे अधिक मुक्तपणे व्यक्त करू शकतात.

ऑस्ट्रेलियातील मेलबर्नमध्ये पीपीएचएच फॅशन स्टोअर चालवणाऱ्या कार्लन पिकिंग्ज म्हणतात, गेल्या काही वर्षांत मागणी आणि पुरुषांच्या शैलींमध्ये आमूलाग्र बदल झाला आहे. दहा वर्षांपूर्वी, आम्हाला कधीच कल्पना नव्हती, की आज आम्ही भरतकाम केलेले, रंगीबेरंगी आणि फुलांचे कपडे खरेदी करू.

# स्मार्टफोनचे स्टोरेज फुल झाले?

टेक्नो टॉक




स्मार्टफोन हा आपल्या जगण्याचा एक अविभाज्य भाग झाला आहे; मात्र अनेकदा इंटरनल स्टोरेज फुल झाल्यास फोन स्लो होतो. तुमच्या फोनमध्ये फोटो, व्हिडिओ किंवा महत्त्वाच्या फाइल्ससाठी जागा शिल्लक नसेल, तर तुमच्यासाठी एक आनंदाची बातमी आहे. जिओ त्यांच्या माय जिओ ॲपद्वारे काही रिचार्ज प्लॅनवर वापरकर्त्यांना मोफत गुगल जेमिनी प्रो सबस्क्रिप्शन देत आहे.

कंपनी या सबस्क्रिप्शनसह कोणत्याही अतिरिक्त शुल्काशिवाय २ टीबी क्लाउड स्टोरेज देखील देत आहे. म्हणजेच या ऑफरसह तुम्ही तुमच्या स्मार्टफोनची स्टोरेज स्पेस वाढवून मोठ्या फाइल्स, फोटो आणि व्हिडीओ क्लाउडवर सुरक्षित ठेवू शकता.


रिलायन्स जिओ त्यांच्या माय जिओ ॲपमध्ये निवडक वापरकर्त्यांना जेमिनी प्रोचा मोफत ॲक्सेस देत आहे. फोनमध्ये ऑफर आधीच एक सक्रिय जिओ पोस्टपेड प्लॅन रिचार्ज केला असला तरी ही खास ऑफर आता ॲपमध्ये दिसत आहे. ही ऑफर कोणत्याही अतिरिक्त शुल्काशिवाय उपलब्ध करून दिली जात आहे. वापरकर्ते माय जिओ ॲप उघडून आणि ऑफर्स किंवा बेनिफिट्स विभागात जाऊन त्यांच्या अकांउटमध्ये हे सबस्क्रिप्शन सक्रिय करू शकतात. ही ऑफर सक्रिय झाल्यानंतर क्लाउड स्टोरेज फोन, टॅब्लेट आणि लॅपटॉपवर सहजपणे वापरता येते.

सर्वप्रथम माय जिओ ॲप उघडा. आता टॉपवर दिसणाऱ्या जेमिनी ऑफरवर क्लिक करा. यानंतर तुम्हाला गुगलच्या पेजवर रिडायरेक्ट केले जाईल. येथे तुम्हाला गूगल आय प्रो सबस्क्रिप्शनशी संबंधित सर्व माहिती मिळेल. येथून ॲक्टिव्ह प्लॅन पर्यायावर क्लिक करा. काही मिनिटांतच तुम्हाला मोफत क्लाउड स्टोरेजचा ॲक्सेस दिला जाईल. आणि अशाप्रकारे तुम्ही मोबाईलमध्ये स्टोरेज स्पेस वाढवू शकता. तुम्ही खूप फोटो आणि व्हिडीओ शूट करत असाल तर ही ऑफर खूप उपयुक्त ठरेल.

कामासाठी किंवा अभ्यासासाठी मोठ्या फाइल्स साठवायच्या आहेत त्यांनाही खूप फायदा होऊ शकतो. टू टीबी स्टोरेजसह वापरकर्त्यांना त्यांच्या फोनमधून वारंवार डेटा डिलीट करण्याची आवश्यकता राहणार नाही.

# बना एआय इंजिनियर

करियर




दोन कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) अभियांत्रिकी हे महत्त्वाचे आणि उपयुक्त करिअर म्हणून पुढे येत आहे. या क्षेत्रात दीर्घकालीन करिअर स्थैर्य, उच्च शिक्षण आणि संशोधनाचीही मोठी संधी उपलब्ध आहे.

एआय अभियंता, मशिन लर्निंग अभियंता, डेटा सायंटिस्ट, डीप लर्निंग अभियंता, भाषा प्रक्रिया अभियंता, संगणकीय दृश्य अभियंता, रोबोटिक्स अभियंता आणि संशोधक अशी पदे या क्षेत्रात आहेत. माहिती तंत्रज्ञान, बँका, विमा कंपन्या, आरोग्यसेवा संस्था, संशोधन केंद्रे आणि शासकीय विभागांमध्ये तसेच खासगी क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. माहिती तंत्रज्ञान आणि सॉफ्टवेअर कंपन्या ॲप्लिकेशन्स, स्वयंचलित प्रणाली, माहितीचे विश्लेषण करणारी साधने आणि एआयवर आधारित सॉफ्टवेअर विकसित करण्यासाठी एआय अभियंत्यांची नेमणूक करतात. तसेच मोठ्या तंत्रज्ञान कंपन्या आणि आंतरराष्ट्रीय उत्पादन करणाऱ्या कंपन्या कृत्रिम बुद्धिमत्ता संशोधन आणि नव्या तंत्रज्ञानाच्या विकासावर मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करतात.

स्टार्टअप कंपन्या आरोग्य, आर्थिक सेवा, शिक्षण आणि ई-कॉमर्स क्षेत्रात नावीन्यपूर्ण एआय उपाय विकसित करतात. उत्पादन व वाहन उद्योगात एआयचा वापर स्मार्ट उत्पादन प्रणाली, स्वयंचलित वाहने, गुणवत्ता तपासणी आणि पुरवठा साखळी व्यवस्थापनासाठी होतो. बँकिंग आणि विमा क्षेत्रात फसवणूक शोधणे, जोखीम विश्लेषण आणि ग्राहक सेवा सुधारण्यासाठी एआयचा वापर केला जातो. शासकीय क्षेत्रात इस्रो, डीआरडीओ, बार्क, सी-डॅक यासारख्या संशोधन संस्थांमध्ये एआय अभियंत्यांना संशोधन व विकास प्रकल्पांमध्ये संधी मिळतात. संरक्षण आणि सुरक्षा विभागात एआयचा वापर देखरेख प्रणाली, सायबर सुरक्षा आणि आधुनिक संरक्षण तंत्रज्ञानासाठी केला जातो.

एआय अभियांत्रिकीच्या पदवी शिक्षणासाठी जेईई (मुख्य व प्रगत), राज्यस्तरीय प्रवेश परीक्षा किंवा सीयुईटी दिली जाते. पदव्युत्तर शिक्षणासाठी गेट, सीयूईटी-पीजी आणि विद्यापीठांच्या स्वतंत्र प्रवेश परीक्षा असतात. बहुतेक वेळा गेट गुणांच्या आधारे निवड केली जाते.

संगणक विज्ञान, माहिती विश्लेषण, माहिती तंत्रज्ञान किंवा इलेक्ट्रॉनिक्स या शाखांमध्ये बी.ई. किंवा बी.टेक पदवी तसेच एम.टेक, एम.एस्सी किंवा एम.एस. पदवीचे पर्याय उपलब्ध आहेत. याशिवाय पायथन प्रोग्रॅमिंग, यंत्र-अध्ययन (मशिन लर्निंग), सखोल अध्ययन आणि मोठ्या प्रमाणातील माहिती प्रक्रिया यांसारखे प्रमाणपत्र अभ्यासक्रम उपयुक्त ठरतात. प्रकल्प कार्य, औद्योगिक प्रशिक्षण आणि प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेतल्यास नोकरी मिळण्याच्या संधी अधिक वाढतात.

## एटिकेट्स

### कसं वागायचं?



दोस्तांनो, नागरिकशास्त्र हा विषय आपण शाळेत शिकतो. नागरिकशास्त्र म्हणजे सिव्हिक सेन्स. सार्वजनिक जीवनात कसं वागायचं हे या शास्त्रातून कळतं. ही जाणीव खरं तर उपजत असावी लागते किंवा विकसित करावी लागते. पण आपण भारतीय इस सेन्स को मारो गोली म्हणून लोकांना त्रास देत असतो. रस्त्यावर कचरा करण्यापासून हॉटेलमध्ये किंचाळत बोलण्यापर्यंत अनेक चुकीच्या गोष्टी आपण करतो. तरूण मंडळी यात मागे नाहीत. दोस्तांनो, ही सिव्हिक सेन्स यंदा नक्की विकसित करा. सार्वजनिक वाहतूक सेवेचा वापर करताना मोठ्याने गाणी ऐकणं टाळा. स्वत:सोबत हेडफोन्स ठेवा. तुमचं आवडतं गाणं इतरांना ऐकायचं असतंच असं नाही. त्यामुळे हेडफोन्स लाऊन निवांत गाणी ऐका.

* सार्वजनिक ठिकाणी लाडिकपणे आणि मोठ्याने बोलू नका. फोनवर बोलताना काळजी घ्या. शांतपणे बोला. तुमच्या आयुष्यात काय चाललंय, याबद्दल इतरांना काहीच घेणंदेणं नसतं. प्रत्येकाला आपले उद्योग असतात हे लक्षात घ्या.

* रांगेचा आदर राखा. बँक, एटीएम किंवा कुठेही रांग असेल तर मध्ये घुसू नका. इतरांनाही महत्त्वाची कामं असू शकतात, याचं भान ठेवा.

# नोकरी थेट मलेशियात!

रोजगारवाटा



सध्या, अनेक कमी कुशल कामगार एजंटना लाखो रुपये देऊन मलेशियामध्ये नोकऱ्या शोधतात. सरकार एक नवीन थेट भरती प्लॅटफॉर्म तयार करण्याच्या दिशेने काम करत आहे. त्यामुळे कंपन्या एजंटशिवाय परदेशी कामगारांना कामावर ठेवू शकतील. यामुळे परदेशी कामगारांचे पैसे वाचतील आणि कंपन्या कमिशनदेखील वाचवू शकतील.

द मलेशियन रिझर्व्हच्या मते, सरकारचे उद्दिष्ट परदेशी कामगारांचे शोषण कमी करणे आणि भरती प्लॅटफॉर्मद्वारे भरती खर्च कमी करणे आहे. मानव संसाधन मंत्री दातुक सेरी रामानन रामकृष्णन यांनी सांगितले, की या विषयावर गृह मंत्रालय आणि इतर प्रमुख भागधारकांशी चर्चा केली जाईल आणि नंतर ते मंजुरीसाठी मंत्रिमंडळासमोर सादर केले जाईल. कामगार भरतीमध्ये एजंट आणि मध्यस्थांची भूमिका दूर करण्याची सरकारची योजना आहे.


रामानन म्हणाले, की, मध्यस्थांवर अवलंबून राहिल्यामुळे परदेशी कामगारांना मोठे कमिशन द्यावे लागते. ते आधुनिक गुलामगिरीचे बळीदेखील बनतात. हा मुद्दा संसदेत अनेक वेळा चर्चेत आला आहे आणि माध्यमांमध्येही उपस्थित करण्यात आला आहे. आम्हाला मध्यस्थांची समस्या दूर करायची आहे.

काही परदेशी कामगार मलेशियामध्ये नोकरी मिळवण्यासाठी पाच हजार ते आठ हजार डॉलरपर्यंत कमिशन देतात. यामुळे सामाजिक समस्या निर्माण होतात आणि मानवी तस्करी आणि मनी लाँडरिंगचा धोका असतो. त्यांनी पुढे सांगितले, की आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने असा आदेश दिला आहे, की भरती शुल्क परदेशी कामगाराच्या एका महिन्याच्या पगारापेक्षा जास्त नसावे.

प्रस्तावित पोर्टलमुळे कंपन्यांना परदेशी कामगारांशी थेट संवाद साधता येईल. यामुळे दोन्ही पक्षांना कामावर ठेवण्यापूर्वी रोजगाराच्या अटी स्पष्टपणे समजण्यास मदत होईल. सध्या कंपन्या एजंट्सद्वारे संवाद साधतात. एजंट कोणत्या अटींवर कामगारांना नोकरीच्या ऑफरवर स्वाक्षरी करून घेत आहेत, याची कंपनीला माहिती नाही. पोर्टलमुळे कंपन्यांना नोकरीच्या अटींवर आधारित परदेशी कामगारांशी संपर्क साधता येईल. व्हर्च्युअल मुलाखतीदेखील उपलब्ध असतील. भाषेच्या आव्हानांवर मात करण्यासाठी रिअल-टाइम भाषांतरासाठी आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय) चा वापर केला जाईल.

## झटपट रेसिपी

### चविष्ट ऑम्लेट साल्सा



दोस्तांनो, अंड्याचं ऑम्लेट हा होस्टेलियन्सचा आवडता पदार्थ. भूक लागली की अंडी आणायची आणि मस्त ऑम्लेट- पाव खायचा. अगदी झटपण तयार होणारा असा हा पदार्थ. आपल्या नेहमीच्या ऑम्लेटला आपण ट्विस्ट देऊ शकतो. ऑम्लेट साल्सा हा प्रकार नक्की ट्राय करा.

**साहित्य:** दोन अंडी, चिरलेला कांदा आणि टोमॅटो, चिरलेली भोपळी मिरची, साल्सा चटणी, मोझरेला चीझ आणि मीठ.

**कृती:** अंडी फेटून घ्या. त्यात कांदा, टोमॅटो, भोपळी मिरची घालून नीट हलवा. त्यात सालसा चटनी आणि किसलेलं चीज घाला. चवीपुरतं मीठ घाला. तवा घ्या. त्यावर थोडं तेल किंवा बटर घाला. त्यावर मिश्रण ओता. दोन्ही बाजूंनी शिजवून घ्या. ऑम्लेटवरही थोडं किसलेलं चीज घालता येईल. हे ऑम्लेट ब्रेड किंवा पावासोबत मस्त लागतं. ब्रेडचे टोस्ट करून घ्या आणि गरमागरम खा.

# घरातून विरोध आहे!

मॅच मेकिंग

मी २४ वर्षांचा तरुण असून गेल्या आठ महिन्यांपासून एका मुलीच्या प्रेमात आहे. आयुष्यात स्थिरस्थावर झाल्यावर आमचा लग्न करायचा विचार आहे. पण तिच्या मोठ्या भावाला आमचं नातं पसंत नाही. त्यामुळे माझ्याशीच नाही तर तिच्याशीही तो कठोरपणे वागतो. त्याच्या भुलथापांना बळी पडून तिलाही हे नातं संपवायचं आहे. प्रेमात अशा गोष्टी घडत असतात. त्यामुळे यातून मार्ग काढायला हवा, असं मला वाटतं. मी काय करू? आमच्या नात्यात पुढे अडचणी येतील का? भविष्यात आमचं लग्न होईल का?



उत्तर : नात्यांमधली प्रत्येक गोष्ट वाटते तितकी सोपी नसते आणि प्रश्न तुमच्या जोडीदाराच्या कुटुंबाचा असेल तर विचार करण्याची गरज आहे. बरेचदा एखादं नातं स्वीकारण्यासाठी कुटुंबियांना वेळ लागू शकतो. आपल्या मुलांच्या जोडीदारांबाबतच्या त्यांच्या अपेक्षा, कल्पना वेगळ्या असू शकतात. सध्याच्या परिस्थितीत तू धीर धरायला हवा. मैत्रीण आणि तिच्या कुटुंबियांना थोडा वेळ द्यायला हवा. दुसरं म्हणजे तू मैत्रिणीशी स्पष्टपणे बोल. तुझ्या भावना तिला सांग. तुम्ही दोघं समुपदेशकाची मदत घेऊ शकता. तुमच्याकडे भरपूर वेळ आहे. वय पाहता तुम्ही अजूनही करीअरमध्ये स्थिरस्थावर झाला नसाल. त्यामुळे मैत्रिणीच्या कुटुंबाला वेळ द्यायला हवा. त्यांना नीट समजावून सांगायला हवं. मैत्रिणीने तुझ्यावर विश्वास ठेवायला हवा. सगळं काही सुरळीत पार पडलं तर नात्यांमध्ये अडचणी येणार नाहीत.

# एका मेसेजवरून अकाऊंट रिकामे!

सावध राहा

व्हॉट्सॲपवर सध्या घोटाळे इतके वाढले आहेत, की एक छोटासा मेसेज किंवा कॉल तुमचे संपूर्ण बँक अकाऊंट रिकामे करू शकतो. अनेक उत्सवाच्या शुभेच्छा म्हणून बनावट मेसेज येत आहेत. यात लिंक किंवा पीके फाइल असते. त्यावर क्लिक केल्यावर फोनमध्ये मालवेअर शिरते. ओटीपी चोरले जातात आणि बँक अकाऊंटवरून पैसे ट्रान्सफर होतात. सायबर गुन्हेगार बनावट कॉल करून बँक अधिकारी किंवा पोलिस म्हणून धमकावतात, डिजिटल अरेस्टची भीती दाखवतात. या फसवणुकीपासून वाचण्यासाठी व्हॉट्सॲपने नवीन सुरक्षा फीचर्स आणली आहेत, त्यांचा ताबडतोब वापर करा.

सेटिंग्जमध्ये जा, प्रायव्हसी ॲडव्हान्स्डमध्ये जा, ब्लॉक अननोन अकाउंट मेसेजेस चालू करा. यामुळे अज्ञात नंबरवरून येणारे मेसेज आपोआप ब्लॉक होतात. स्ट्रिक्ट अकाऊंट सेटिंग्ज ऑन केल्यास अज्ञात व्यक्तींकडून मीडिया, अटॅचमेंट्स आणि लिंक प्रिव्ह्यू ब्लॉक होतात. अज्ञात कॉल सायलेंट करण्याची सुविधा देखील आहे. हे सेटिंग्ज चालू केल्याने स्कॅमरला तुमची पर्सनल माहिती मिळणे खूप कठीण होते.

टू-स्टेप व्हेरिफिकेशनसाठी सेटिंग्जमध्ये जा. अकाउंटमध्ये जाऊन टू-स्टेप व्हेरिफिकेशन निवडा. ६ अंकी पिन सेट करा आणि ईमेल ॲड करा. यामुळे एखाद्याला तुमचा ओटीपी मिळाला तरी पिनशिवाय खाते हॅक करता येत नाही. ॲप नेहमी लेटेस्ट व्हर्जनवर अपडेट ठेवा. ओटीपी, बँक डिटेल्स किंवा पिन कधीही शेअर करू नका.

हे छोटे पाऊल उलचुन तुम्ही सुरक्षित राहू शकता. संशय आल्यास ताबडतोब बँकेला कळवा किंवा सायबर हेल्पलाइन १९३० वर कॉल करा. व्हॉट्सॲप हे फक्त चॅटिंगचे माध्यम नाही, तर तुमची गोपनीयता आणि पैसे वाचवण्याचेही साधन आहे.

# निसर्गसौंदर्यासाठी रणथंभोर

भटकंती

राजस्थानमधील रणथंभोर हे केवळ भारतातच नाही तर जगभरात निसर्गसौंदर्यासाठी आणि रॉयल बंगाल टायगर्ससाठी ओळखले जाते. घनदाट जंगले, टेकड्या, तलाव आणि ऐतिहासिक वारशाने भरलेला हा परिसर दरवर्षी हजारो देशी-विदेशी पर्यटकांना आकर्षित करतो. जंगल आणि ऐतिहासिक वारशाचे घर असलेले रणथंभोर जगभरात प्रसिद्ध आहे. राजस्थानातील सवाई माधोपूर जिल्ह्यात स्थित, रणथंभोर राष्ट्रीय उद्यान सुमारे ४०० चौरस किलोमीटर पसरलेले आहे. १९८० मध्ये, याला राष्ट्रीय उद्यान म्हणून घोषित करण्यात आले, इथे रॉयल बंगाल टायगर, बिबटे, अस्वल, हरीण आणि इतर अनेक दुर्मिळ वन्यजीव आढळतात. उद्यानातील जीप आणि कॅन्टर सफारी पर्यटकांसाठी एक प्रमुख आकर्षण आहे. घनदाट जंगलातून सफारीदरम्यान वन्य प्राण्यांचे जवळून निरीक्षण करणे हा एक संस्मरणीय अनुभव आहे.



रणथंभोरच्या मध्यभागी असलेले सुजान शेरबाग हे एक आलिशान हॉटेल आहे. जंगलाच्या मध्यभागी असलेले हे हॉटेल खरोखरच शाही सुविधा देते. या हॉटेलमध्ये रॉयल लायन सूट आणि टेंटेड जंगल सूट सारखे पर्याय आहेत. त्याचे भाडे प्रति रात्र लाखो रुपये आहे. दोन रात्री आणि तीन दिवसांचे किमान बुकिंग आवश्यक आहे.

रणथंभोर राष्ट्रीय उद्यानातील एका टेकडीवर असलेला रणथंभोर किल्ला हा या प्रदेशातील एक ऐतिहासिक स्थळ आहे. १० व्या शतकात बांधलेला हा किल्ला युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट आहे. या किल्ल्यावरून संपूर्ण जंगलाचे सुंदर दृश्य दिसते. किल्ल्याच्या आत अनेक प्राचीन मंदिरे आणि अवशेष पर्यटकांना इतिहासाची कहाणी सांगतात.

रणथंभोर किल्ल्यात असलेले त्रिनेत्र गणेश मंदिरदेखील एक प्रमुख स्थळ मानले जाते. भगवान गणेशाची तीन डोळ्यांची मूर्ती असलेले हे देशातील एकमेव मंदिर आहे. लग्न किंवा कोणत्याही शुभ प्रसंगी लोक येथे भगवान गणेशाला आमंत्रणे पाठवतात.

रणथंभोरमध्ये असलेले पद्म तालाब हे वन्यजीव पाहण्यासाठी आणि छायाचित्रणासाठी एक लोकप्रिय ठिकाण आहे. तलावाजवळील प्राचीन अवशेष हे ठिकाण आणखी खास बनवतात. दरम्यान, जोगी महाल हे एकेकाळी जयपूर राजघराण्याचे विश्रांतीस्थान होते. आज, हा राजवाडा सौंदर्यासाठी आणि आजूबाजूच्या हिरवळीसाठी ओळखला जातो. राजवाड्याजवळील मोठे वटवृक्षदेखील पर्यटकांना आकर्षित करतात.

# महामार्गावर वाहनचालक, प्रवाशांना लुटणाऱ्या कोयता गँगच्या मुसक्या आवळल्या

नगर – गेल्या अनेक दिवसांपासून नगर पुणे महामार्गावर चास शिवारात वाहनचालक, प्रवासी यांना रात्रीच्या वेळी अडवून कोयत्याचा धाक दाखवत लुटमार करणाऱ्या टोळीचा नगर तालुका पोलिसांनी छडा लावला असून या टोळीतील तिघांना बेड्या ठोकल्या आहेत. एक जण पसार झालेला असून त्याचा शोध पोलिस घेत आहेत. पकडलेल्या आरोपींकडून २२ फेब्रुवारी रोजी पहाटे लुटलेल्या मुद्देमालापैकी ८९ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असून या टोळीने लुटमारीचे ३ गुन्हे केल्याचे समोर आले आहे. तुषार विजय उमाप (वय १९), बुद्धभुषण संतोष आंग्रे (वय २२, दोघे रा.दैठणे गुंजाळ, ता. पारनेर), तेजस लक्ष्मण उगलमुगले (वय १९, रा. मनोरमा कॉलनी, नवनागापुर) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत, तर त्यांचा साथीदार भोऱ्या उर्फ विठ्ठल नवनाथ काळे (रा. गांधीनगर, बोल्हेगाव, अहिल्यानगर) हा पसार झालेला आहे.

बीड जिल्ह्यातील कोथरुळ (ता. माजलगाव) येथील बाळासाहेब काशीनाथ कदम व त्यांचा साथीदार पंकज श्रीराम कदम हे दोघे स्वीफ्ट कारने (क्र. एमएच १२ युएम २२४८) नगर मार्गे पुणे येथे त्यांचे भावास भेटण्यासाठी जात असताना २२ फेब्रुवारी रोजी पहाटे ४.३० च्या सुमारास त्यांना शौचास लागल्याने ते कामरगाव शिवारातील हॉटेल गुरुदत्त हॉटेलचे जवळ गाडी रोडचे बाजुला घेवुन थांबले असता तेथे चार अनोळखी इसमांनी हातात कोयते घेवुन येवुन दोघांच्या गळ्याला लावले. त्यांना लाथाबुक्यांनी मारहाण करुन त्यांना त्यांचे स्विफ्ट गाडीमध्ये बसवुन नगरकडे नेत असताना स्विफ्ट कार व लक्झरीचा अपघात झाला. सदर आरोपींनी फिर्यादी व साक्षीदार यांचे १८ हजार रुपये रोख, ५० हजार रुपये फोन पे मधून ऑनलाईन व ४७ हजार रुपये किंमतीचे मोबाईल, चार्जर, जर्कीन असा एकुण १ लाख १५ हजारांचा मुद्देमाल शस्त्रांचा धाक दाखवुन, मारहाण करुन बळजबरीने चोरुन नेला

### चोरलेला ८९ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत, लुटमारीचे ३ गुन्हे आले उघडकीस



नगर पुणे महामार्गावर वाहनचालक, प्रवाशांना लुटणाऱ्या कोयता गँगला पकडल्यानंतर त्यांच्या समवेत नगर तालुका पोलिसांचे पथक.

आहे. याबाबत नगर तालुका पोलिस ठाण्यात २३ फेब्रुवारी रोजी जबरी चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर घटनेचे गांभीर्य ओळखुन नगर तालुका पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे यांनी या लुटारूंचा कसून तपास सुरु केला. त्यांना मिळालेल्या गोपनीय माहिती नुसार आणि तपास पथकाने केलेल्या तांत्रिक तपासानुसार हा गुन्हा तुषार विजय उमाप याने त्याच्या साथीदारांच्या समवेत केल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी तिघांची माहिती काढत त्यांना पकडले तर त्यांचा साथीदार भोऱ्या हा पसार झाला. पकडलेल्या आरोपींकडून गुन्ह्यात गेलेल्या मालापैकी ५ हजार रुपये रोख रक्कम, ५० हजार ऑनलाईन ट्रान्सपर केलेले, वनप्लस कंपनीचा मोबाईल, चार्जर, जर्कीन तसेच आरोपीतांनी गुन्ह्यात वापरलेल्या हत्यारांपैकी एक लोखंडी कत्ती, एक लोखंडी कोयता असा एकुण ८९ हजार ६०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

### लुटमारीच्या ३ गुन्ह्यांची दिली कबुली

तसेच अशा प्रकारचे गुन्हे यापुर्वी नगर तालुका पोलीस स्टेशन हद्दीत घडलेले असुन त्याबाबत आरोपींकडे कसून चौकशी केल्यावर त्यांनी २ महिन्यापुर्वी चास घाटामध्ये एका कुटुंबाची गाडी बंद पडलेली असताना त्यांना मारहाण करुन त्यांचे सोन्याचे दागिने, रोख रक्कम, कागदपत्रे बळजबरीने चोरुन नेल्याचे सांगितले. तसेच आरोपी तुषार उमाप याने व त्याचा फरार साथीदार भोऱ्या उर्फ विठ्ठल काळे याने चास शिवारात पेट्रोल पंपाजवळ सरगम हॉटेल जवळ मध्यरात्री तीन इसमांना गजाचा धाक दाखवुन त्यांचे गळ्यातील सोन्याची चैन व त्यांचा मोबाईल बळजबरीने चोरुन नेल्याचे सांगितले.

सदरची कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे, पोलीस उपनिरीक्षक जयेश गांगुर्डे, स.फौ.दत्तात्रय हिंगडे, पो.हे.कॉ. नितीन शिंदे, पो.हे.कॉ. सुभाष थोरात, पो. हे.कॉ. मंगेश खरमाळे, पो.कॉ. विक्रांत भालसिंग, मोबाईल सेलचे पो.कॉ. नितीन शिंदे यांचे पथकाने केली आहे.

# नागापूर एमआयडीसीतील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना महापुरुषांच्या जीवनचरित्रांची पुस्तक भेट

### उमेद सोशल फाऊंडेशनचा छत्रपती शिवाजी महाराज व संत गाडगे महाराज जयंतीचा उपक्रम

नगर – नागापूर एमआयडीसी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत छत्रपती शिवाजी महाराज व संत गाडगे महाराज यांची संयुक्त जयंती विविध सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरी करण्यात आली. उमेद सोशल फाऊंडेशन, जिल्हा क्रीडा कार्यालय व मेरा युवा भारत यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



नागापूर एमआयडीसीतील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना महापुरुषांच्या जीवनचरित्रांची पुस्तक भेट देण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने करण्यात आली. उपस्थितांनी शिवरायांच्या शौर्य, नेतृत्वगुण आणि संत गाडगे महाराजांच्या समाजसुधारक कार्याचा आढावा घेत विद्यार्थ्यांना त्यांच्या विचारांचे महत्त्व पटवून दिले. यावेळी शाळेतील ग्रंथालयासाठी ६५ थोर महापुरुषांच्या जीवनचरित्रासह विविध अभ्यासपूर्ण पुस्तकांची भेट देण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि त्यांना प्रेरणादायी साहित्य उपलब्ध व्हावे, हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे फाऊंडेशनच्या वतीने स्पष्ट करण्यात आले. तसेच यावेळी विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणीही करण्यात आली. तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांची प्राथमिक आरोग्य तपासणी करून निरोगी आरोग्यासाठी आवश्यक सूचना देण्यात आल्या.

उमेद सोशल फाऊंडेशनचे अध्यक्ष अनिल साळवे यांनी आपल्या मनोगतातून महापुरुषांचे विचार केवळ जयंतीपुरते मर्यादित न ठेवता ते आचरणात आणणे गरजेचे असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच सामाजिक जाणीव जोपासावी, असे आवाहन त्यांनी केले.

जिल्हा सचिव उज्वला गवळी म्हणाल्या की, उमेद सोशल फाऊंडेशन गरजू घटकातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी सातत्याने प्रोत्साहन देत आहे. या चळवळीद्वारे अनेक गरजूंना आधार मिळत असून, हे कार्य प्रत्येक गरजवंत विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा आमचा प्रयत्न राहील, असे त्यांनी स्पष्ट केले.

या प्रसंगी बालचित्रकला स्पर्धेत राज्यस्तरावर चौथा क्रमांक मिळवणारी विद्यार्थिनी कु. विधी गुडेकर हिचा सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमास उमेद सोशल फाऊंडेशनचे अध्यक्ष अनिल साळवे, सचिव सचिन साळवी, जिल्हा सचिव उज्वला गवळी, खजिनदार संजय निर्मळ, सल्लागार ॲड. दिपक थिवर, सोशल मीडिया प्रतिनिधी विजय लोंढे, सदस्य रवी सुरेकर, प्रदीप बागुल, कावेरी भिंगारदिवे, तसेच काकासाहेब म्हस्के होमिओपॅथी कॉलेजचे डॉ. अजहर शेख, माजी विद्यार्थी राहुल जाधव, संदीप साळवे, सचिन वानखेडे, नितीन भाकरे आदी उपस्थित होते.

याशिवाय जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक अनिल मूळे, आशा लोखंडे, योगेश शिंदे, मंगल गवळी, राजेंद्र औटी, शुभांगी राहणे, वैशाली शेळके, छाया ढगे, रेखा वाघमारे यांच्यासह शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र औटी यांनी केले. वैशाली शेळके यांनी आभार मानले.

या उपक्रमासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, क्रीडा अधिकारी भाऊराव वीर, प्रवीण कोंढावळे, प्रियांका खिंडरे तसेच मेरा युवा भारतचे जिल्हा समन्वय अधिकारी सत्यजित संतोष, रमेश गाडगे व ॲड. महेश शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले.

## जिल्ह्यातील सैनिकी मुलांच्या वसतिगृहाच्या विविध कंत्राटी पदांसाठी २७ फेब्रुवारीपर्यंत अर्ज करावेत

नगर – जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, अहिल्यानगर यांच्या आधिपत्याखाली असलेल्या सैनिकी मुला-मुलींच्या वसतिगृहासाठी कंत्राटी तत्त्वावर विविध पदे भरण्यात येणार असून पात्र उमेदवारांनी २७ फेब्रुवारी पर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी वि. ल. कोरडे यांनी केले आहे.

वसतिगृहामध्ये निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात वसतिगृह अधीक्षक, सहायक वसतिगृह अधीक्षक, चौकीदार, स्वयंपाकी, माळी व सफाई कामगार ही पदे भरण्यात येणार आहेत. या पदांसाठी नागरी उमेदवार देखील अर्ज करू शकतात. मात्र, माजी सैनिकांना प्राधान्य देण्यात येईल. उमेदवार निर्व्यसनी असणे आवश्यक आहे. वसतिगृह अधीक्षक व चौकीदार यांचा कामाचा कालावधी २४ तासांचा राहील.

अर्जासोबत सैन्य सेवेतील डिस्चार्ज बुक, माजी सैनिक ओळखपत्र, आधार कार्ड यांच्या छायांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. उमेदवाराचे वय ४५ वर्षांपेक्षा कमी असावे. विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करून पात्र उमेदवारांना मुलाखतीची तारीख कळविण्यात येईल. इच्छुक माजी सैनिक व नागरी उमेदवारांनी या संधीचा लाभ घ्यावा, असेही कळविण्यात आले आहे.

## उमैंजा शेखचा रमजानचा पहिला रोजा

नगर – साई एन्जल इन्टरनॅशनल स्कूलमध्ये यु के जी मध्ये शिकणारी पाच वर्षाच्या कु.उमैजा तौसीफ शेख हिने लहान वयातच आपला पहिला रोजा (उपवास) पूर्ण करून कुटुंबाचा व परिसराचा अभिमान वाढविला आहे.



इतक्या लहान वयात रोजा ठेवणे हे कौतुकास्पद असून उमैजा ने आनंदाने व श्रद्धेने आपला पहिला रोजा पूर्ण केला. तिच्या या यशाबद्दल कुटुंबीय, नातेवाईक व मित्रपरिवाराकडून तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. अल्लाह तआला तिच्या या नेक प्रयत्नाला कबूल करो व तिला उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य आणि उज्वल भवितव्य देवो, अशी सर्वांकडून दुआ करण्यात येत आहे.

## ‘आनंदोत्सव’ ट्रस्टच्या पुरस्कारांचे २५ फेब्रुवारीला वितरण

नगर – आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्ट अहिल्यानगर या संस्थेच्या वतीने जाहीर झालेल्या विविध राष्ट्रीय व राज्य पुरस्कारांचे वितरण २५ फेब्रुवारीला होत आहे. पाईपलाईन रोड वरील मधुरांजनी सभागृहात सकाळी १०:३० वाजता होणाऱ्या या कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन ट्रस्टचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे यांनी केले आहे.

या कार्यक्रमात लोणावळा येथील मनशक्ती प्रयोग या संस्थेचे कार्यकारी विश्वस्त प्रमोदभाई शिंदे आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत संघचालक प्रा. नानासाहेब जाधव यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महर्षी अगस्तिमुनी ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. के. डी. धुमाळ असणार आहेत. तसेच अकोले येथेल ज्येष्ठ पत्रकार प्राचार्य प्रकाश टाकळकर यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.

गत बारा वर्षांपासून विविध प्रकारचे पुरस्कार संस्थेच्यावतीने देण्यात येतात. यावर्षी देण्यात आलेल्या ‘कृतार्थ दाम्पत्य जीवन गौरव’ पुरस्काराचे पहिले मानकरी अहिल्यानगर येथील शिक्षणतज्ज्ञ व प्रबोधनकार प्रा.सौ. मीराताई पटारे व प्रा. भीमराज पटारे आणि डोंबिवली येथील प्रबोधनकार, कथानिवेदक आणि मोरया प्रकाशनचे प्रकाशक दिलीप महाजन व सौ. सुरेखा महाजन यांना, तर प्रतिवर्षी दिला जाणारा ‘शारदादुर्गा स्त्रीशक्ती गौरव पुरस्कार’ पत्रकार श्रीमती शिल्पा रसाळ यांना व ‘प्रज्ञावंत गौरव पुरस्कार’ अकोले-संगमनेर येथील ज्येष्ठ अभिवाचक, रंगकर्मी, अनिल सोमणी यांचा समावेश आहे. याच कार्यक्रमात वे.शा.सं. मोरेश्वरशास्त्री धर्माधिकारी व सौ. सुरेखा धर्माधिकारी तसेच ‘श्री ज्ञानेश्वरी अभ्यासवर्गा’चे संयोजक डॉ. दिलीप धनेश्वर व सौ. वीणा धनेश्वर यांचाही अमृतमहोत्सवी वाटचालीसाठी विशेष सत्कार आयोजित करण्यात आला आहे. पुरस्कार वितरण सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन संस्थेच्या विश्वस्त सौ. उषा सहस्त्रबुद्धे व कोषाध्यक्ष गजेंद्र गाडगीळ यांनी केले आहे.

# शहरात सुरु असलेल्या हनुमान चालीसा पाठ कार्यक्रमांना वेळ वाढवून द्या

### प्रेरणा प्रतिष्ठानची पोलीस अधिक्षकांकडे मागणी

नगर – हनुमान जयंतीनिमित्त शहरात विविध सत्संग मंडळांच्या वतीने विविध भागांमध्ये सध्या दररोज सायंकाळी हनुमान चालीसा व भजन संध्याचे आयोजन केले जात आहे. मात्र काही ठिकाणी हा कार्यक्रम सुरु असताना पोलिसांनी हा कार्यक्रम बंद केल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे शहरातील हिंदू भाविकांची अस्मिता असलेल्या या धार्मिक कार्यक्रमांना पोलीस प्रशासनाने अधिकचा वेळ वाढवून द्यावा व पोलिसांची कारवाई थांबवावी, या मागणीचे निवेदन आ.संग्राम जगताप यांच्या वतीने प्रेरणा प्रतिष्ठान व दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळाने पोलीस अधिक्षक सोमानाथ घार्गे यांना दिले आहे.



शहरात सुरु असलेल्या हनुमान चालीसा पाठ कार्यक्रमास अधिकचा वेळ वाढवून द्यावा या मागणीचे निवेदन प्रेरणा प्रतिष्ठानच्या वतीने पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांना देण्यात आले.

यावेळी नगरसेवक सुरेश बनसोडे, प्रेरणा प्रतिष्ठानचे पदाधिकारी वैभव ढाकणे व मंगेश खताळ, अतुल कावळे, सनी कर्पे, रुपेश शिदोरे, सुनील जांगिड, रमेश शहारे, प्रवीण परदेशी, नयन भंडारी, संतोष मेहत्रे, बंडू शिंदे व आनंद राठोड आदी उपस्थित होते. यावेळी दक्षिण मुखी हनुमान सत्संग मंडळाच्या वतीने सोमनाथ घार्गे यांना फोटो फ्रेम देऊन सन्मान करण्यात आला.

नगरसेवक सुरेश बनसोडे म्हणाले, शहरात सुरु असलेल्या हनुमान चालीसा पाठ या हिंदूंच्या धार्मिक कार्यक्रमाची सुरु असलेली परंपरा राज्यात केवळ अहिल्यानगरमध्ये असून गेल्या ४० वर्षांपासून जोपासली जात आहे. या कार्यक्रमात सर्वसामान्य हिंदू भाविक सहभागी होत देवाचे नामस्मरण करत असतात. मात्र काहींनी या कार्यक्रमात अडथला आणण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे पोलीस प्रशासनाने या कार्यक्रमास वाढीव वेळ द्यावा अशी मागणी आम्ही केली असून पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी ती मान्य केली आहे.

वैबाव ढाकणे म्हणाले, शहरात सुरु असलेल्या हनुमान चालीसा पाठ कार्यक्रमांमुळे शहरात धार्मिक वातावरण निर्माण झाले आहे. आ.संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली प्रेरणा प्रतिष्ठानच्या वतीने पोलीस अधिक्षकांना निवेदन दिले आहे. या धार्मिक कार्यक्रमास पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी वेळ वाढवून देण्याच्या मागणीस सकारात्मक भूमिका घेतली आहे. शहरातील सर्व भाविकांनी या हनुमान चालीसा कार्यक्रमांमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन केले.



वृद्ध व्यक्तीची ३ लाखांची रोकड पळविणारा आरोपी पकडल्यानंतर त्याच्या समवेत कोतवाली पोलिसांचे पथक.

# वृद्ध व्यक्तीची ३ लाखांची रोकड पळविणारा आरोपी पकडला

### कोतवाली पोलिसांची कारवाई, चोरलेली सर्व रक्कम केली हस्तगत

नगर – वृध्द व्यक्ती कडील ३ लाख रूपयांची रोख रक्कम चोरून पसार झालेल्या संशयित आरोपीस कोतवाली पोलिसांच्या तपास पथकाने कारवाई करत गजाआड केले आहे. त्याच्याकडून चोरीस गेलेली संपूर्ण रक्कम तसेच गुन्ह्यात वापरलेली दुचाकी जप्त करण्यात आली आहे. लाला किसन सुद्रीक (रा. कोंडाणे, ता. कर्जत) असे त्याचे नाव आहे.

शिरूर (जि. पुणे) तालुक्यातील कौठे यमई येथील बाजीराव काशीबा पोकळे (वय ८५) यांनी त्यांच्या आजारी मुलीच्या हॉस्पिटलचे बिल भरण्यासाठी तीन लाख रूपयांची रोकड बँकेतून काढली होती. ती रक्कम घेऊन ते नगरला आले असता त्यांच्या ओळखीचा लाला सुद्रीक त्यांना भेटला. त्याने चहा पिण्यासाठी त्यांना आग्रह धरला. नंतर दुचाकीवर बसवून केडगाव परिसरात निर्जन ठिकाणी नेवून त्यांच्या कडील रक्कम लुटून पसार झाला होता.

यासंदर्भात पोकळे यांच्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिसांकडून लाला सुद्रीक याचा शोध सुरू होता. २२ फेब्रुवारी रोजी गुन्हे तपास पथक गस्त करत असताना पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांना गोपनीय माहिती मिळाली की संबंधित संशयित आरोपी पुणे बसस्थानक, अहिल्यानगर येथे येणार आहे.

पोलिसांनी तत्काळ सापळा रचून बसस्थानक परिसरात पाहणी केली असता संशयित इसम आढळून आला. त्याची खात्री करून ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान त्याने आपले नाव लाला किसन सुद्रीक असल्याचे सांगितले. पुढील तपासात त्याने वृध्दाच्या उपचारासाठी आणलेली ३ लाख रूपयांची रक्कम आपणच चोरल्याची कबुली दिली. यानंतर त्याला अटक करून त्याच्याकडून चोरीस गेलेली संपूर्ण ३ लाख रूपयांची रोख रक्कम तसेच गुन्ह्यात वापरलेली दुचाकी जप्त केली आहे. ही कारवाई पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकातील पोलिस अंमलदार संतोष बनकर, राहुल शिंदे, विनोद बोरगे, साबीर शेख, दौड, विशाल दळवी, अविनाश वाकचौरे, दिपक रोहकले, शिरीष तरटे, अभय कदम, सुरज कदम, सत्यम शिंदे, दत्तात्रय कोतकर, अतुल काजळे, अमोल गाडे, महेश पवार, रमेश शिंदे, राम हंडाळ, किरण बडे, अतुल लाटे, राहुल गुंडू (दक्षिण मोबाईल सेल), महिला अंमलदार रोहिणी दरंदले, पंडित, पल्लवी रोहकले, जाधव यांचे पथकाने केली आहे.

## जुने भांडण मिटविण्याचा बहाण्याने बोलावून तरुणावर चौघांनी केला धारदार शस्त्र आणि लाकडी दांडक्याने हल्ला

नगर – जुने भांडण मिटविण्याचा बहाणा करत तरुणाला शहरातील नालेगाव भागातील लांडेस्थळ येथील एका हॉटेलवर बोलावून त्याच्यावर धारदार शस्त्र आणि लाकडी दांडक्याने हल्ला करत बेदम मारहाण केल्याची घटना २२ फेब्रुवारीला रात्री ८.२० च्या सुमारास घडली. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत विशाल भाऊ साळवे (वय २०, रा. नीलक्रांती चौक, अहिल्यानगर) याने फिर्याद दिली आहे. फिर्यादी याला ’आपण जुने भांडण मिटवून घेऊ’ असे सांगून आरोपी सार्थक ठोंबरे याने लांडे स्थळाजवळील हॉटेल कॉर्नवेल येथे बोलावून घेतले. विशाल तेथे पोहोचताच दबा धरून बसलेल्या आरोपींनी त्याला गाठले. यावेळी आरोपी यश कांडेकर याने विशालच्या डोक्यावर धारदार शस्त्राने वार करून गंभीर जखमी केले. त्याचवेळी कुणाल परभणे याने लाकडी दांडक्याने विशालच्या पाठीवर व हातावर जबर मारहाण केली.

या हल्ल्यात सार्थक ठोंबरे आणि राधेशाम आजबे यांनीही विशालला लाथाबुक्क्यांनी मारहाण करत जमिनीवर आपटले. आरोपींनी केवळ मारहाणच केली नाही, तर विशालला अश्लील शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकीही दिली.

याप्रकरणी विशाल साळवे याने दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलिसांनी सार्थक ठोंबरे, यश कांडेकर, कुणाल परभणे आणि राधेशाम आजबे यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. पोनि. जगदीश भांबळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार योगेश चव्हाण या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

## विविध सामाजिक पुरस्कारांसाठी २८ फेब्रुवारीपर्यंत प्रस्ताव सादर करा

नगर – इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या वतीने राज्य शासनातर्फे देण्यात येणाऱ्या विविध सामाजिक पुरस्कारांसाठी पात्र व्यक्ती व संस्थांकडून २८ फेब्रुवारी पर्यंत प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. समाजाच्या उन्नतीसाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या घटकांनी आपले प्रस्ताव मुदतीत सादर करावेत, असे आवाहन सहायक सहसंचालक विनोद लोंढे यांनी केले आहे.

अहिल्यानगर येथील इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या सहायक संचालक कार्यालयामार्फत हे प्रस्ताव स्वीकारले जाणार आहेत. यामध्ये प्रामुख्याने महात्मा बसवेश्वर सामाजिक समता-शिवा पुरस्कार, नटराज पुरस्कार, विश्वकर्मा पुरस्कार व क्रांतीवीर राजे उमाजी नाईक पुरस्कार या मानाच्या पुरस्कारांचा समावेश आहे.

अर्जदार व्यक्ती किंवा संस्था महाराष्ट्र राज्याचे रहिवासी असणे आवश्यक असून त्यांनी संबंधित क्षेत्रात सातत्यपूर्ण व उल्लेखनीय कार्य केलेले असावे. शासन निर्णयातील सर्व अटींची पूर्तता करून आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करणे बंधनकारक आहे. अपूर्ण, चुकीची माहिती असलेले किंवा मुदतीनंतर प्राप्त झालेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत. या पुरस्कारांबाबतचा अंतिम निर्णय शासन स्तरावर घेण्यात येणार असून त्यासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार स्वीकारला जाणार नाही. अर्जाचा नमुना व शासन निर्णयातील सविस्तर अटींची माहिती इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या अहिल्यानगर जिल्हा कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहे.

